रविवार, १७ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ९०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## आयपीएलपाठोपाठ आजपासून टी-२० वर्ल्डकपचा थरार

**दुबई :** आयपीएल संपते तोच रविवार (दि. १७)पासून टी-२० विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होत आहे. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेचे गट आधीच जाहीर झाले आहेत. त्यानुसार पहिल्या फेरीत आठ संघ सुपर १२मध्ये स्थान मिळवण्यासाठी खेळतील. आयर्लंड, नेदरलँड्स, श्रीलंका आणि नामिबियाला अ गटात, तर ओमान, पीएनजी, स्कॉटलंड आणि बांगलादेशला ब गटात स्थान देण्यात आले आहे. प्रत्येक गटातील फक्त अव्वल दोन म्हणजेच एकूण चार संघ सुपर १२ फेरी गाठतील. सुपर १२चा पहिला सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दुबईमध्ये २३ ऑक्टोबर रोजी खेळला जाईल. दुसरा सामना इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात त्याच दिवशी खेळला जाईल, तर भारताचा पहिला सामना कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध २४ ऑक्टोबर रोजी खेळला जाणार आहे.

अंतरंग
उद्धव ठाकरेंचे बायकोच्या नावाने घोटाळे -सोमय्या/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
टी-२० वर्ल्डकपनंतर द्रविड होणार टीम इंडियाचा कोच/६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना बदलण्याचे उद्धव ठाकरेंचे मनसुबे

## फडणवीसांचा आरोप; दसरा मेळाव्यातील टीकेचा समाचार

**नागपूर : प्रतिनिधी**

शिवसेनेचा दसरा मेळावा शुक्रवारी मुंबईत झाला. या मेळाव्यात बोलताना शिवसेना पक्षप्रमुख आणि राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर टीका केली. यावर राज्याचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राज्यघटना बदलण्याचे उद्धव ठाकरेंचे मनसुबे असल्याचे फडणवीसांनी म्हटले आहे. ते शनिवारी (दि. १६) नागपुरात माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.

फडणवीस म्हणाले, काल माननीय मुख्यमंत्र्यांनी संघराज्य व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आणि ही व्यवस्था बदलली पाहिजे, असे सांगितले. म्हणजे काय? भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानच बदलण्याचे मनसुबे त्यांनी बोलून दाखवले. काहीही झाले तरी डॉ. आंबेडकरांचे संविधान बदलले जाणार नाही. ते कोणी बदलू शकणार नाही. त्यामुळे हे संविधान बदलण्याचे छुपे अजेंडे, काही कम्युनिस्ट लोकांना सोबत घेऊन आणि तशाच डाव्या विचारांच्या काही पक्षांच्या सोबतीने हा जो मनसुबा तुम्ही रचताय, तो आम्ही कधीच पूर्ण होऊ देणार नाही. (पान २ वर..)



### बाळासाहेब ठाकरेंचे भाषण खरी पर्वणी, आता सगळेच अळणी!

**मनसेचा टोला**

*__मुंबई :__ दसऱ्या मेळाव्यातील शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भाषणावर भाजपपाठोपाठ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही निशाणा साधला आहे. दसरा मेळाव्याच्या दिवशी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचे भाषण म्हणजे खरी पर्वणी असायची. आता मात्र सगळेच अळणी, असा खोचक टोला मनसे नेते संदीप देशपांडे यांनी लगावला.* (पान २ वर..)

### महाराष्ट्र हा महाराष्ट्रच राहील!

उद्धव ठाकरेंवर चौफेर हल्ला चढवताना फडणवीसांनी म्हटले की, मुख्यमंत्री म्हणाले, आम्हाला महाराष्ट्राचा बंगाल करायचाय. म्हणजे नक्की काय करायचेय? खंडणीबाजीमुळे बंगालमध्ये एकही उद्योग टिकलेला नाही. विरोधात जो बोलेल त्याचे हात पाय तोडून फासावर लटकवायचा असा महाराष्ट्र घडवायचा आहे का? आमच्यात जोवर रक्ताचा एक थेंब आहे तोवर महाराष्ट्राचा बंगाल होऊ देणार नाही. महाराष्ट्र महाराष्ट्रच राहील!

(छाया : महेश शिंदे)



# महाडमध्ये कोरोनाचा विसर

## मंत्र्यांच्या उपस्थितीत गर्दी आणि धक्काबुक्की

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषदेच्या नवीन प्रशासकीय भवनाचा लोकार्पण सोहळा शनिवारी (दि. १६) पार पाडला. या वेळी झालेली गर्दी आणि धक्काबुक्की पाहता पालिकेलाच कोरोनाचा विसर पडल्याचे पहावयास मिळाले. दरम्यान, या सोहळ्यास आलेल्या तीन मंत्र्यांनी महाडकरांना केवळ दिवाळीच्या कोरड्या शुभेच्छा, तर तटकरेंना कानपिचक्या दिल्या.

महाड पालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय भवन आणि संत रोहिदास सभागृह यांचे लोकार्पण राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाले. या सोहळ्यास नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार सुनील तटकरे, आमदार भरत गोगावले, नगराध्यक्ष स्नेहल जगताप, शोभा सावंत, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर आदी उपस्थित होते.

यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात झालेल्या सभेत थोरात यांनी, काँग्रेसमधून तटकरेंना राष्ट्रवादीने पळवले, असा चिमटा काढला. या वेळी त्यांनी सी. डी. देशमुखांची आठवण करून दिली तसेच आघाडी सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली, पण कोकणासाठी नाही, असा खुलासाही केला.

एकनाथ शिंदे यांनी महाडमधील इमारतींसाठी स्टील कंपल्सरी करणार, असे सांगून स्थानिक बिल्डरांची झोप उडवली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी तटकरेंना बजावत स्नेहलला सांभाळून घ्या, असा सल्ला दिला तसेच (पान २ वर..)

# प्रदीर्घ संघर्षानंतर मिळविलेले यश रोमहर्षक -आमदार प्रशांत ठाकूर



(छाया : जितेंद्र जाधव)

## ■ रोठ बुद्रुकमध्ये ग्रामसचिवालयाचे उद्घाटन, जलशुद्धीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीमध्ये सत्तेवर आलेले सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी प्रदीर्घ संघर्षानंतर मिळविलेले यश हे रोमहर्षक असल्याचे त्यांच्या भावनेतून दिसून येते. या यशासाठी त्यांनी २५ वर्षे त्यांच्या विरोधकांविरुद्ध लढा दिला. हे करीत असताना त्यांना विविध प्रकारच्या संकटांचा सामना करावा लागला. प्रसंगी गुन्हे दाखल होऊन तुरुंगात जावे लागले, मात्र याला न घाबरता, न डगमगता त्यांनी आपला संघर्ष चालू ठेवला आणि येथील जनतेला विकास काय असतो हे दाखवण्याची संधी मिळताच कंपन्यांचा सीएसआर व प्रशासनाचा निधी वापरून ग्रामसचिवालय आणि इतर कामांबाबतीत विक्रम करून दाखविला आहे, अशा शब्दांत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीमधील विद्यमान सत्ताधाऱ्यांचे कौतुक केले.

रोहे तालुक्यातील रोठ बुद्रुक येथे नव्याने बांधण्यात आलेल्या ग्रामसचिवालयाचे उद्घाटन आणि जलशुद्धीकरण आरओ प्लांटचे भूमिपूजन शनिवारी (दि. १६) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. (पान २ वर..)

## 🔍 निवडक

### केरळमध्ये मुसळधार पाऊस; काही जण बेपत्ता, अलर्ट जारी

**तिरूअनंतपूरम :** केरळच्या दक्षिण आणि मध्य भागात शनिवारी (दि. १६) मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले आणि नद्यांना पूर आला आहे. यामध्ये १० जण बेपत्ता झाल्याचे वृत्त आहे. दरम्यान, अरबी समुद्रातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे हवामान विभागाने राज्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला असून विविध जिल्ह्यांत रेड व ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

### रशियात कोरोनाचे थैमान; एक हजार बाधितांचा मृत्यू

**मॉस्को :** रशियामध्ये कोरोना महामारीने पुन्हा डोके वर काढले असून शनिवारी (दि. १६) कोरोनाग्रस्त १००२ जणांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली. रशियात कोरोनामुळे एकाच दिवसात बळी गेलेल्यांची ही सर्वाधिक संख्या आहे, तर आतापर्यंत दोन लाख २२ हजार ३१५ जणांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. लसीकरणाकडे नागरिक पाठ फिरवत असल्याने बाधितांची आणि कोरोनाबळींची संख्या वाढत असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

# अलिबागमध्ये अल्पवयीन मुलीला देहविक्रीला लावण्याचा प्रयत्न

## फार्महाऊस मालक, महिलांसह चौघांना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

घरातून पळालेल्या अल्पवयीन मुलीला काम देण्याच्या बहाण्याने देहविक्रीच्या नरकात ढकलण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार अलिबाग तालुक्यात उघडकीस आला आहे, मात्र या मुलीने अत्यंत हुशारीने या नराधमांच्या तावडीतून पळ काढत मांडवा सागरी पोलीस ठाणे गाठले आणि स्वतःची सुटका करून घेतली. या प्रकरणी दोन महिला व एका फार्महाऊस मालकासह चौघांना अटक करण्यात आली आहे.

पीडित मुलगी (वय १६) मूळची अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील आहे. दोन महिन्यांपूर्वी ती क्षुल्लक कारणावरून घर सोडून पुण्यात आली. तेथून ती चेन्नई, गोवा, बेळगाव असा प्रवास करत पनवेल येथे पोहचली. तिची पर्स चोरीला गेल्याने ती दिवसभर पनवेल बसस्थानकातच बसून होती. या वेळी नागोठण्यातील हुजरा मोहल्ला येथील दोन महिलांची तिच्यावर नजर पडली. त्यांनी काम देण्याचे आश्वासन देत तिला पनवेल येथील एका लॉजवर ठेवले. त्यानंतर करंजा येथून बोटीने रेवस येथे आणले व आपल्या मुलाच्या ताब्यात दिले. या मुलाने मोटरसायकलवरून पीडित मुलीला सासवणे (ता. अलिबाग) येथील किशोर फार्महाऊसवर आणले. तेथे त्या मुलाने काही ग्राहकांना बोलावून या मुलीला त्यांच्यासोबत शारीरिक संबंध ठेवण्यास सांगितले. तिने यासाठी विरोध केला. त्यामुळे तिला धमकावण्यात आले. परिणामी पीडित मुलीने नाईलाजास्तव तयारी दाखवली. घडल्या प्रकाराने मुलगी हादरली होती, मात्र त्याही परिस्थितीत तिने प्रसंगावधान राखत तेथून पळ काढला आणि काही ग्रामस्थांच्या मदतीने मांडवा पोलीस ठाणे गाठले.

या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी सोनाली कदम यांनी फार्महाऊस मालकासह दोन महिला व तिच्या मुलाला अटक केली तसेच पीडितेच्या घरी संपर्क साधून याबाबत कल्पना दिली. आरोपींना अलिबाग न्यायालयात हजर केले असता, पाच दिवस पोलीस कोठडीचे आदेश देण्यात आले. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## राहुल गांधी पुन्हा स्वीकारणार काँग्रेसचे अध्यक्षपद?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



दिल्लीत शनिवारी (दि. १६) झालेल्या काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणी बैठकीत काही नेत्यांनी राहुल गांधींनी पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारावे, असा सूर लावला. त्यामुळे राहुल गांधी या मागणीवर काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेय. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राहुलबाबा या मागणीवर विचार करणार आहेत.

खासदार राहुल गांधी यांनी २०१९मधील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारूण पराभव झाल्यानंतर अध्यक्षपद सोडण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय त्यांनी मागे घेण्यासाठी प्रयत्नही करण्यात आले, मात्र राहुल यांनी निर्णयावर ठाम राहणे पसंत केले होते. आता पुन्हा पक्षाध्यक्षपद भूषविण्यासाठी ते तयार झाल्याचे समजते.

# सुधागडमध्ये नदीत बुडून दोघांचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील राबगाव येथे शुक्रवारी (दि. १५) सायंकाळी घरगुती देवीच्या विसर्जनावेळी दोन तरुणांचा तमोसोली पुलाजवळ अंबा नदीत बुडून मृत्यू झाला. शिवेंद्र चौहान (वय २४, सध्या रा. राबगाव, ता. सुधागड, मूळ रा. उत्तर प्रदेश) आणि विवेक लहाने (वय २०, रा. राबगाव, ता. सुधागड) अशी मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत.

देवीचे विसर्जन करून नदीपात्रातून किनाऱ्यावर येत असताना पाय घसरून हे तरुण नदीत पडले आणि त्यांचा बुडून मृत्यू झाला. याबाबत पाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
रविवार, दि. १७ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली
- (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर

टीप : रविवार, दि. १७ ऑक्टोबर २०२१ रोजी ग्रामीण लसीकरण होणार नाही.



(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

पनवेल : दसरा गणेशोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी न्हावेखाडी उत्तरपाडा येथील गणेश मित्र मंडळाच्या बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सदस्य सागर ठाकूर, सदाशिव ठाकूर आदी उपस्थित होते.

# उद्धव ठाकरेंचे बायकोच्या नावाने घोटाळे

## भाजप नेते किरीट सोमय्या यांची टीका





**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या दसरा मेळाव्यानिमित्तच्या भाषणावर आता टीकास्त्र सुरू झाले आहे. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, आमदार आशिष शेलार यांच्यानंतर आता भाजप नेते किरीट सोमय्या यांनीही या भाषणातल्या काही मुद्द्यांवर टीका केली आहे. कालच्या भाषणात बोलताना ठाकरे यांनी सोमय्या यांच्या अप्रत्यक्षपणे टीका करत असे वक्तव्य केले की कोणाच्याही बायका-मुलांवर आरोप करणे हा अक्करमाशीपणा आहे. यावरच सोमय्या यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

या वेळी सोमय्या म्हणाले, मी ठाकरेंच्या विधानाशी एकदम सहमत आहे. कोणीही खोटे आरोप केलेले योग्य नाही. पण जर उद्धव ठाकरे आपल्या बायकोच्या रश्मी उद्धव ठाकरेंच्या नावाने घोटाळा करत असेल तर साडेबारा कोटी जनता जाब विचारणार. मुख्यमंत्री लुटमार करतात. उपमुख्यमंत्री तर..अरे बापरे! अजित पवारांनी विधान केले होते, माझ्या बहिणीच्या घरी का इन्कम टॅक्सवाले गेले? किरीट सोमय्यांनी सगळी कागदपत्रे ठेवली ना? तर बायकोच्या नावाने, बहिणीच्या नावाने बेनामी व्यवहार करणे हे त्याहीपेक्षा मोठे पाप आहे. मग तो मुख्यमंत्री असो, उपमुख्यमंत्री असो!

ते पुढे म्हणाले, मुख्यमंत्र्यांचा मुलगा त्या बिल्डरसोबत संचालक होता, किरीट सोमय्याने कागदपत्रे ठेवली ना? मग का पार्टनरशीप मागे घेतली? म्हणून महापालिकेच्या माफिया कॉन्ट्रॅक्टरकडून पार्टनरशीपचा मिळालेला पैसा बेनामी कंपन्यांच्या माध्यमातून गुंतवणार असाल तर त्याचा जाब मुख्यमंत्र्यांना द्यावा लागणार.

सोमय्या यांनी पवार कुटुंबावरही टीका केली आहे. ते म्हणाले, अजित पवार, सुनेत्रा पवार, शरद पवार, सुप्रिया सुळे, पार्थ पवार, रोहित पवार आणि आता त्यांना ठाकरे सरकारमध्ये एक नवीन माफिया साथीदार सापडला आहे तो म्हणजे उद्धव ठाकरे. आता हे पहिला हल्ला सुरू करणार सीबीआय, ईडी, इनकम टॅक्स सगळ्यांना टार्गेट करणार, आमच्या बायका-मुलांवर कारवाई होतेय, मोदी घडवून आणतायत हे सगळे बोलणार. त्यावेळी समाजातले कार्यकर्ते जे ह्यांचेच पीआर यंत्रणा आहेत तेही आपले काम सुरू करणार. पण राज्याच्या आणि केंद्रीय तपास यंत्रणांमध्येही काही चांगले अधिकारी आहेत आणि न्यायालयही साडेबारा कोटी जनतेच्या बाजूने उभे राहील.

# पक्षापेक्षा राज्याला महत्त्व द्या!

## आमदार प्रसाद लाड यांची मुख्यमंत्र्यांवर बोचरी टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात महिला सुरक्षेचा प्रश्न कधी नव्हे, एवढा गंभीर बनला आहे. मात्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आजच्या दसरा मेळाव्यात आपल्या अखत्यारीतील हा गंभीर प्रश्न, फक्त केंद्रावर ढकलण्याचे कर्तृत्व दाखवून दिले, अशी टीका भाजप प्रदेश उपाध्यक्ष आमदार प्रसाद लाड यांनी केली आहे.

शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात मुख्यमंत्री ठाकरे यांनी महिला अत्याचारासंदर्भात देशव्यापी चर्चा करण्याचे आवाहन केले. या प्रश्नी विधिमंडळाचे दोन दिवसांचे अधिवेशन घेण्याची सूचना राज्यपालांनी ठाकरे यांना केली होती. त्यावर हा प्रश्न देशव्यापी असल्याने यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून चर्चा करण्यास मोदी यांना सुचवावे, असे आपण राज्यपालांना सांगितल्याचे ठाकरे आज म्हणाले. मात्र आजच्या भाषणात ठाकरे यांनी या प्रश्नी ठोस असे काहीही उपाय वा धोरण सांगितले नाही, अशी टीका लाड यांनी केली आहे.




महिला अत्याचाराबाबत देशव्यापी चर्चा व्हावी, अशा घटना घडूच नयेत याबाबत त्यात उपाय योजना सुचवाव्यात, असे मुख्यमंत्री ठाकरे यांनी सांगितले, मात्र इतरांनी सांगितलेल्या सूचना ऐकणे हे तर कोणीही करू शकतो. मुख्यमंत्र्यांनी त्याहीपेक्षा वेगळे काम करणे, राज्यासाठी काही ठोस धोरण ठरवणे अपेक्षित आहे. निदान महाराष्ट्रात तरी महिला अत्याचाराच्या घटना घडू नयेत यासाठी पोलिसी गस्त, इलेक्ट्रॉनिक सीसीटीव्ही देखरेख वाढवणे, पोलिसांना आधुनिक टेहळणी साहित्य देणे, महिलांसाठीचे प्रस्तावित कायदे त्वरेने अमलात आणणे, महिला आयोगाच्या अध्यक्षाची नियुक्ती त्वरेने करणे आदी उपाययोजना करणे मुख्यमंत्र्यांना सहज शक्य आहे. मात्र यापैकी काहीही न करता त्यांना फक्त केंद्रावर 'जबाबदारी' ढकलून केंद्रावर खापर फोडायचे आहे, असा टोला लाड यांनी लगावला.

महाराष्ट्र बंद करण्यासाठी वापरलेली शिवसेनेची आणि प्रशासनाची ताकद महिला संरक्षणासाठी वापरणे मुख्यमंत्र्यांना सहज शक्य होते. सामान्यांवर आणि महिलांवर अन्याय करणाऱ्या मित्रपक्षांच्या गणंगांवर कारवाई करणे, गुंडांना धाक बसेल अशा तरतूदी कायद्यात करणे, यासंदर्भात न्याय यंत्रणेचे हात बळकट करणे, महिला अत्याचाराची प्रकरणे वेगात निकाली काढण्यासाठी न्यायालयांना सोयीसुविधा देणे आदी बाबी ठाकरे सहज करू शकतात. मात्र असे काही विचार मंथन व ठोस कृती सांगण्यापेक्षा ठाकरे यांनी फक्त हमरीतुमरीवर येऊन भाजपवर टिका केली. यातून त्यांची अस्वस्थताच दिसून आली, याने राज्याचा काहीही फायदा होणार नाही. मुख्यमंत्र्यांनी पक्षापेक्षा राज्याला महत्त्व देण्याची गरज आहे, असेही आमदार प्रसाद लाड यांनी स्पष्ट आहे.

## निवडक

### पनवेलचे लिमये वाचनालय सुरू

**पनवेल :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय शनिवार (दि. १६) पासून सकाळी ८ ते ११.३० व सायंकाळी ४.३० ते ८ या वेळेत पूर्ववत सुरू करण्यात आले आहे. वाचनालयाची साप्ताहिक सुटी सोमवारी जाहीर करण्यात आली असून वाचकांनी अधिक माहितीसाठी २७४५४८८५ व मो. क्र. ९१३७८७७९८२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन वाचनालयातर्फे करण्यात आले आहे.



**उरण : भाजपचे बालई गाव अध्यक्ष महेश माळी व रजनी माळी यांनी नवरात्रोत्सव मंडळाच्या देवीचे दर्शन घेतले.**



**पनवेल : श्री स्वामी समर्थ महिला मंडळाच्या वतीने नवरात्रीनिमित्त नऊ दिवस गावदेवी पाडा येथील स्वामी समर्थ मठात भजन करण्यात आले. शुक्रवारी याची सांगता झाली.**



**उरण : दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा! अशा या मुहूर्तावर सोने खरेदी केली जाते. यानिमित्ताने बाजारपेठेतील महालक्ष्मी ज्वेलर्समध्ये ग्राहकांनी गर्दी केली होती.**

# पनवेल परिसरात चौघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात चार वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या दुर्घटनेत चौघा जणांचा मृत्यू झाला आहे.

पनवेल शहराजवळील हॉटेल गार्डन समोरील सिग्नलजवळून आपल्या दुचाकीवरुन रेणुकुमारी धनंजयकुमार (वय ४२, रा. कामोठे) या चालल्या असताना अज्ञात वाहनाची धडक त्यांच्या गाडीला बसल्याने झालेल्या दुर्घटनेत त्या गंभीररित्या जखमी होवून मयत झाल्या आहेत. या घटनेनंतर वाहनचालक पसार झाला आहे. तर दुसऱ्या घटनेत ओबेदुल्लाह हे भंगार वेचण्याचे काम करतात. ते गव्हाण फाटा परिसरात भंगार वेचण्यासाठी गेले असताना एका डंपरमधील दगड डोक्याला लागून ओबेदुल्लाह अब्दुलमजीद चौधरी (वय ४२) यांचा गंभीररित्या जखमी होवून मृत्यू झाला आहे.

तिसऱ्या घटनेत मुंबई-पुणे मार्गावर कामोठे येथील उड्डाणपुलाच्या सुरुवातीला घडलेल्या पहिल्या अपघातात राहुल दुर्गानंद झा (वय २७) या तरुणाचा मृत्यू झाला. कळंबोलीतील रोडपाली भागात राहणारा राहुल झा हा आपल्या स्कुटीवरुन मुंबईच्या दिशेने कामानिमित्त जात होता. त्याची स्कुटी पुरुषार्थ पेट्रोल पंपाजवळच्या उड्डाणपुलाच्या चढणावर आली असताना, पाठीमागून अज्ञात वाहनाने त्याला धडक दिली. यात राहुल गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर कामोठे पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर चौथ्या घटनेत मुंबई-गोवा महामार्गावर शिरढोण गावच्या हद्दींत रस्ता ओलांडणाऱ्या समर बसु मतारी (वय ३०) याचा मृत्यू झाला. मृत समर मतारी हा शिरढोण येथील जेडब्ल्युसी लॉजिस्टीक्समध्ये कामाला होता. कामावरून सुटल्यानंतर समर मतारी हा पनवेल येथे जाण्यासाठी जयंता चौधरी याच्यासोबत मुंबई-गोवा महामार्ग ओलांडून जात होता. या वेळी पनवेलकडून पेणच्या दिशेने जाणाऱ्या इर्टिगा कारने समर मतारी याला धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाल्याने त्याचा काही वेळातच मृत्यू झाला. शहर पोलिसांनी कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.



**पनवेल : प्रबुद्ध सामाजिक संस्था आणि नवतरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी धम्मचक्र परिवर्तन दिन बुद्धविहार येथे साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेचे व करंजाडे बौद्धवाड्यातील धम्मबांधव व भगिनी उपस्थित होते.**

# 'होप मिरर'तर्फे गोल्डन प्रेस्टीज पुरस्कार सोहळा

**मुंबई : प्रतिनिधी**

होप मिरर फाउंडेशनने गुरुवारी (दि. १४) पहिला गोल्डन ह्यूमॅनिटी पुरस्कार २०२१ आणि पहिला गोल्डन प्रेस्टीज पुरस्कार २०२१ आयोजित केला होता. या पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे नगरसेवक विक्रांत पाटील, एसपी सुनील बोंडे आणि चंद्रकांत मते उपस्थित होते. या कार्यक्रमाला एकता मंचने पाठिंबा दिला.



अंधेरी वर्सोवा येथे झालेल्या कार्यक्रमात संपूर्ण इंडियाच्या पुरस्कार विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सागर उत्वल, शाहनवाज शेख, डॉ. नूरी परी, मनीष गुप्ता, सुमन ऑस्कर, अरुणा नाभ, सदफ शेख, सिंधू नायर, स्वामी अभिनंदगिरी महाराज, स्वप्नील शिरसाठ आणि सुंदरी ठाकूर यांना गोल्डन ह्यूमॅनिटी पुरस्कार मिळाला.

समाजकल्याण क्षेत्र सुप्रसिद्ध कलाकार, गायक आणि विनोदी कलाकारांना त्यांच्या उद्योगातील उत्कृष्टतेसाठी गोल्डन प्रेस्टीज पुरस्कार देण्यात आला. यामध्ये मीनाक्षी दीक्षित, केट शर्मा, निकिता रावल, व्हीआयपी, गायक दिलीप सेन, संदिप सोपरकर, आरती नागपाल, पंकज बेरी, शर्लिन चोप्रा, शिव्या पठाणिया, पायल घोष, नायरा बॅनर्जी, वेरोनिका वनीज आणि अरुण बक्षी यांना गोल्डन प्रेस्टीजियस पुरस्कार २०२१ देऊन सन्मानित करण्यात आले.

होप मिरर फाउंडेशन ही नवी मुंबईस्थित एनजीओ आहे. फाउंडेशनचे संस्थापक आणि संचालक रमजान शेख आहेत.

# 'लायन्स'तर्फे जागतिक अन्न दिन साजरा

**पनवेल : रामप्रहरवृत्त**

लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ यांच्या मार्फत जागतिक अन्न दिवस आणि लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनलचे प्रेसिडेंट डग्लस अॅलेक्सझॅण्डर यांच्या वाढदिवसानिमित्त करंजाडे येथे शनिवारी (दि. १६) कामगारांना तसेच पनवेलमधील विविध आश्रममध्ये अन्नवाटप करण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लुणकरण तावरी, लायन क्लबच्या प्रेसिडेंट ज्योती देशमाने, लायन ए. के. शर्मा, लायन हेमंतसिंघ मेहरा, लायन शशांक महेश्वरी, रोटेरियन पुरणसिंग मेहरा, आनंद देशमाने, अलका कोळी आदी उपस्थित होते.





पान १ वरून

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना बदलण्याचे उद्धव ठाकरेंचे मनसुबे

पुढे बोलताना फडणवीस यांनी सांगितले, तुम्ही ज्या आविर्भावात सांगताय की जनतेने भाजपला नाकारले. तर तसे नव्हे, जनतेने काँग्रेस-राष्ट्रवादीला नाकारले आणि तुम्हाला वरपास केले. त्यामुळे हे बेईमानीने तयार झालेले सरकार आहे. आतातरी उद्धव ठाकरेंनी भाबडेपणाचा मुखवटा बाजूला सारून सांगावे की, त्यांना मुख्यमंत्रिपदाची महत्त्वाकांक्षा होती आणि ती पूर्ण केली. दिलेला शब्दच जर पूर्ण करायचा होता तर इतर कोणा शिवसैनिकाला मुख्यमंत्री करता आले असते. सुभाष देसाई, दिवाकर रावते होते. मुख्यमंत्रिपदाची महत्त्वाकांक्षा नव्हती तर नारायण राणे, राज ठाकरेंना का बाहेर जावे लागले, असा सवालही त्यांनी केला.

### बाळासाहेब ठाकरेंचे भाषण खरी पर्वणी, आता सगळेच अळणी!

देशपांडे म्हणाले, मी लहानपणापासून दादरला राहतो. दसरा मेळावा हा शिवतीर्थवर व्हायचा त्या वेळी आम्ही सर्व जण सन्माननीय हृदयसम्राट बाळासाहेबांचे भाषण ऐकायला जायचो. खरेच ती एक पर्वणी होती. नवीन विचार मिळायचा, नवीन दिशा महाराष्ट्राला मिळायची. आता मात्र सगळेच अळणी झालेले आहे. मीठ नसलेल्या जेवणासारखे यंदाच्या दसरा मेळाव्यातील भाषण होते आणि त्यामुळेच अशा पद्धतीचा आता लोकांनाही कंटाळा वाटायला लागलेला आहे. हे म्हणजे गरम पाण्याच्या नावाखाली नुसतेच कोमट पाणी आहे.

मला काय ते हिंदू आणि नवे हिंदूत्वाबद्दल कळत नाही, पण ही नवीन शिवसेना असून बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देऊन काँग्रेसच्या मांडीवर बसली आहे, अशी टीकाही देशपांडे यांनी केली.

### महाडमध्ये कोरोनाचा विसर

तटकरेंच्या पळवापळवीला उत्तर देताना पळवापळवी झाली, हिशोब बरोबर करायला हवा, असे म्हटले. त्याचबरोबर आमदार गोगावलेंचे शिक्षण कमी, पण बोलतात जास्त, असा टोला हाणला.

खासदार तटकरे म्हणाले की, माणिरावांनी माझी माणसं पळवली, पण कविस्करांसाठी मी फील्डींग लावली आहे. मी केले नाही तरी दोष माझ्यावर येतो. माझ्या बोलण्याने प्रत्येकाच्या मनात शंका येते. सगळ्यांना संशय की, गोगावलेंचे आणि माझे काहीतरी गॅटमॅट आहे. पालकमंत्री आदिती तटकरे यांनी स्नेहल जगताप यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या, तर गोगावलेंनी सरसकट मदत देण्याची याचना आपल्याच सरकारकडे केली तसेच पालिका निवडणुकीत महाडची आघाडी तटकरे ठरवणार, असा गौप्यस्फोट केला. नगराध्यक्ष जगताप यांनी माणिकरावांचे स्वप्न पूर्ण करणार असल्याचे सांगितले.

### प्रदीर्घ संघर्षानंतर मिळविलेले यश रोमहर्षक -आमदार प्रशांत ठाकूर

या सोहळ्यास भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अॅड. महेश मोहिते, प्रदेश सचिव रवी मुंडे, दक्षिण रायगड सरचिटणीस मिलिंद पाटील, उपाध्यक्ष राजेश मापारा, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, माजी नगराध्यक्ष संजय कोनकर, भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, शिवसेना रोहा तालुकाप्रमुख समीर शेडगे, विभागप्रमुख संतोष खेरटकर, महिला विभागप्रमुख अमृता साळुंके, रोहिणी गोसावी, भाजप धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, शिवसेना शाखाप्रमुख निलेश वारंगे, सरपंच नितीन वारंगे, रघुनाथ कोस्तेकर, नरेश कोकरे, अनिस शिंदे आदी भाजप, शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

आपल्या भाषणात आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, आपण ज्या पद्धतीने गावचा विकास करीत आहात त्याच पद्धतीने येथील युवा पिढीला रोजगार मिळाला पाहिजे, मुलांना उत्तम शिक्षण, स्त्रीशक्तीला उभारी देण्यासाठी आपण एकत्र एकत्रित राहून काम केले पाहिजे. येथील जनतेने तुमच्यावर जो विश्वास दाखविला आहे तो सार्थ ठरवला पाहिजे आणि यासाठी देशाचे नवे पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या खात्याच्या माध्यमातून व शासनाच्या विविध योजनांतर्गत आपण नक्की अधिक जोमाने पद्धतीने विकास करू.

**गावाच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलो. आमच्यापुढे विकासाची मोठी आव्हाने होती. रोठ बुद्रुक ग्रामपंचायत निवडणूक आम्ही शिवसेना-भाजप युतीमध्ये निवडून आणली आहे. त्यामुळे दोन्ही पक्ष एकत्र येऊन येथे विकास साधू.**

**-नितीन वारंगे, सरपंच, रोठ बुद्रुक**

***रायगडचे माजी पालकमंत्री तथा भाजप प्रदेश सरचिटणीस रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठबळामुळे संघर्ष करण्याची ताकद मिळाली आणि आजवर लढलो. त्यामुळेच १५ ऑगस्टच्या पूर्वसंध्येला या ग्रामपंचायतीवर युतीच्या माध्यमातून झेंडा फडकवू शकलो. त्यानंतर विकासकामे करून विकास खऱ्या अर्थाने काय असतो हे विरोधकांना दाखवून दिले, असे या वेळी भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीचे सदस्य अमित घाग यांनी सांगितले.***

# रिक्षाचालकाला उपचारांसाठी नगरसेवक ठाकूर यांचे पाठबळ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल महापालिकेतील नगरसेवक अॅड. नरेश ठाकूर यांनी केलेल्या समाजकार्यामुळे दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर कोपरा गावातील कृष्णा दुर्गा हा स्वतःच्या पायावर उभा राहिला आहे.

कोपरा गावातील तरुण कृष्णा दुर्गा हा रिक्षा चालक असून त्याचा काही महिन्यांपूर्वी रिक्षा मध्येच अपघात झाला होता. या अपघातात कृष्णाला त्याचा एक पाय गमवावा लागला असून, त्याला उपचारांसाठी आर्थिक अडचण भासत होती. याची महिती मिळताच नगरसेवक अॅड. नरेश ठाकूर त्यांनी नितीन पामकर यांच्या सोबत एमजीएम हॉस्पिटलमध्ये धाव घेतली व ट्रस्टीशी बोलून उपचाराची रक्कम कमी करून घेतली व उपचारांसाठी त्या तरुणाला आर्थिक पाठबळ दिले. नगरसेवक नरेश ठाकूर यांनी केलेल्या या मदतकार्यामुळे कृष्णा दुर्गा हा स्वतःच्या पायावर उभा राहिला आहे.



# बांधकाम व्यवसाय क्षेत्रात मंदी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महामुंबईत यंदा दसऱ्याच्या मुहूर्तावरदेखील मंदी असल्याचे दिसून आले. दसऱ्याच्या दिवशी नवीन गृहप्रकल्पांचा शुभारंभ करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांच्या संख्येत मोठी घट झालेली पहावयास मिळाली.

महामुंबईत सध्या २७ हजारांपेक्षा जास्त घर विक्रीसाठी तयार आहेत. मागील दोन वर्षे या बांधकाम व्यवसायाला मरगळ आली आहे. कोरोना साथीचा फटका विकासकांना बसला आहे, पण रेती, खडी विटा, सिमेंट आणि स्टील या बांधकाम साहित्याच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे कंत्राटदार कोणता दर बांधकामांचा लावतील याचा अंदाज विकासकांना येत नाही. त्यामुळे नवीन प्रकल्पांना विकासक हात घालत नाहीत. त्याचबरोबर सरकारी परवानगी घेत असताना नाकीनऊ येत असल्याने पुढील दोन, चार वर्षे प्रकल्प न करण्याचा निर्णयही काही विकासकांनी घेतले आहेत, तर काही विकासक भूखंड विकण्याच्या तयारीत आहेत. इंधनाच्या भरमसाट दरवाढीमुळे वाहतूक खर्चदेखील कमालीचे वाढले आहेत. त्यामुळे यंदाचा दसरा हसरा नसल्याची प्रतिक्रिया अनेक विकासक व्यक्त करीत आहेत.

नवीन बांधकामे नवी मुंबईच्या दक्षिण भागात रायगड जिल्ह्यात सुरू होणार आहेत. महामुंबई क्षेत्रात सध्या तयार बांधकामांना मागणी आहे, पण नवीन गृहप्रकल्पात घर आरक्षण करण्याच्या फंदात ग्राहक पडत नसल्याचे दिसून येऊ लागले आहे.

सर्वसाधारणपणे दसरा, दिवाळीत या नवीन गृहप्रकल्पांची सुरुवात होत असल्याने नवी मुंबई बिल्डर असोसिएशनच्या कार्यालयात या दिवसाच्या गृहप्रकल्पांच्या भूमिपूजनांची ६० ते ७० निमंत्रण येत असल्याचे असोसिएशनचे माजी अध्यक्ष हरेश छेडा यांनी सांगितले. मात्र यंदा ही संख्या अर्ध्यावर आली आहे. गेल्या वर्षी कोरोना साथीची सुरुवात झाल्याने दसऱ्याला केवळ आठ विकासकांनी नवीन प्रकल्पांची सुरुवात केली होती, पण ही संख्या यंदा तीनपट वाढल्याचे समाधान आहे, असेही छेडा यांनी सांगितले.

दरम्यान, एमएमआरडीए क्षेत्रात अशी २६ हजार घरे विक्रीची वाट पाहत असल्याचे निरीक्षण आहे. मोठ्या घरांना तर बिलकूल मागणी नाही. त्यामुळे मोठे विकासकही छोटी घरे बांधण्यास तयार झाले आहेत.



## गृह, वाहन खरेदीतही घट

दसऱ्याच्या दिवशी सोने, चांदी, घर, दुकान आणि वाहन खरेदीवर कोरोनाचे सावट यंदाही दिसून आले. कोरोनामुळे आर्थिक मंदीचे ढग अधिक गडद झाल्याने बांधकाम व्यावसायिकांनी अनेक सवलती देऊनही ग्राहकांनी गृहखरेदीकडे पाठ फिरवली आहे.

पाच वर्षांपूर्वीच्या दरात घर विक्री, मोफत नोंदणी, मोफत स्टॅम्प ड्युटी, व्हॅट, सेवा करात सूट अशा अनेक सवलती देऊनही ग्राहक घर खरेदी करण्यास पुढे येत नसल्याची चर्चा बांधकाम व्यावसायिकांत आहे. त्यामुळेच खारघर, उलवा, द्रोणागिरी, वडघर, तळोजा, पळस्पे, पनवेल, उरण या भागात अनेक इमारतींतील घरे विक्रीविना आहेत.

दसऱ्याच्या मुहूर्तावर घर खरेदीही करण्यात येते; मात्र यंदा कोरोनामुळे लॉकडाऊन लागू झाल्यानंतर अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत, तर भविष्यात नोकऱ्यांची शाश्वती नसल्यामुळे घर खरेदीकडे अनेक नागरिक पाठ फिरवत आहेत. यंदाच्या दसऱ्यामध्ये नवीन घर खरेदी करणाऱ्याचे प्रमाण घटले आहे, असे इस्टेट एजंट विनायक पेडणेकर यांनी सांगितले.



उरण : न्यू बंगाली नेताजी क्लबच्या वतीने आयोजित श्री दुर्गादेवीच्या पूजेला आमदार महेश बालदी यांनी भेट दिली. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, वाहतूक संघटना जिल्हाध्यक्ष सुधीर घरत, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, तालुका उपाध्यक्ष पंडितशेठ घरत, युवा जिल्हा उपाध्यक्ष शेखर तांडेल, शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शुक्रवारी शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिवादन केले. या वेळी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप नेते प्रवीण खंडागळे, किशन पाटील, अविनाश गायकवाड, चेतन कांबळे, जितेश कांबळे आदी उपस्थित होते.



पनवेल : सुकापूर येथील गंगा गणेश सोसायटीमध्ये कोविड लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, पाली देवद ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता राजेश पाटील, ज्येष्ठ नेते आत्माराम पाटील, डॉक्टर सेलचे तालुका अध्यक्ष डॉ. कृष्णा देसाई, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, सरचिटणीस उदय म्हस्कर, ग्रामपंचायत सदस्य चेतन केणी, तसेच दिवेश भगत, दीपक भगत यांच्यासह सोसायटीचे पदाधिकारी, भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडक

### नावडे येथून दुचाकीची चोरी

**पनवेल :** राहत्या घरासमोरील पार्किंगमध्ये उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना अष्टविनायक बिल्डिंग नावडे फेज येथे घडली आहे. अजयसिंग ठाकूर यांनी त्यांची ५५ हजार रुपयांची बजाज पल्सर कंपनीची काळ्या रंगाची (एमएच ४६ बीएक्स ३१३३) नावडा फेज येथील अष्टविनायक बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. या वेळी अज्ञात चोरट्यांनी ही मोटरसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कारखान्यात विजेची चोरी; गुन्हा दाखल

**पनवेल :** किरवली गाव येथे प्लास्टिक दाना बनवण्याच्या कारखान्यात तब्बल १३ लाखांची वीज चोरी पकडण्यात आली आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरवली टोल प्लाझा जवळ पनवेल मुंब्रा रोड येथे प्लास्टिक दाणा बनवण्याच्या कारखान्यात वीज चोरी होत असल्याची माहिती महावितरणला मिळाली होती. त्यानुसार महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी केली. अनधिकृतपणे मीटरमध्ये फेरफार करून वीज पुरवठा वापरून तो स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी वापरला व महावितरणचे गेल्या सहा महिन्यांपासून ६५ हजार ७०३ युनिटचे नुकसान केले तसेच १२ लाख ९६ हजार ७० रुपयांची वीज चोरी करून महावितरणचे आर्थिक नुकसान केले.

### आरएसएस उरणतर्फे विजयादशमी उत्सव

**उरण :** सालाबादप्रमाणे यंदाही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) उरण यांच्या वतीने उरण नगर परिषदेचे विमला तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास व डॉ. हेगडेवार व गुरुजी माधवराव गोलवालकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आले. या कार्यक्रमास ३६ तरुण व आठ बालके उपस्थित होती. सांगिक गीत घेण्यात आले. शेवटी प्रार्थना घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. दसरा सणाचे महत्त्व सांगण्यात आले.

### मराठी विज्ञान परिषदतर्फे कार्यक्रम

**पनवेल :** केवळ चाकोरीबद्ध जीवन न जगता काही महिला वेगळे क्षेत्र निवडून यशस्वी होत, इतरांना प्रेरणा देतात. अशाच प्रेरणादायी महिलांच्या मुलाखतीचा कार्यक्रम, मराठी विज्ञान परिषद आयोजित करत असते. रविवारी (दि. १७) सायंकाळी ४ ते ५ वाजेपर्यंत होणाऱ्या कार्यक्रमात योगिनी पेठे-शिंत्रे सहभागी होणार आहेत. कर्करोगावर यशस्वीरीत्या मात केलेल्या योगिनी यांनी शून्य कचरा अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे काम केले आहे. वेबेक्सच्या माध्यमाद्वारे विनामूल्य होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अधिक माहिती व नोंदणीसाठी https://mavipa.org/events/prndn2110/ ही लिंक पाहावी.

### दसऱ्यानिमित्त आपट्याचे रोप भेट



**पनवेल :** आर्या वनौषधी संस्थेतर्फे आपट्याची पाने सोनं म्हणून एकमेकांना भेट न देता आपटा वृक्षाची रोपे भेट देऊन दसरा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. आर्या वनौषधी संस्थेने आपटा या वृक्षाची १०१ रोपे भेट देवून एक आगळा वेगळा उपक्रम राबविला. या वेळी संस्थेचे दत्तू कोल्हे यांनी आपटा या वृक्षाबद्दल माहिती असलेली पत्रके व आपटा या वृक्षाच्या औषधी गुणधर्मांची माहिती वनौषधी प्रेमींना दिली. गेल्या दहा वर्षांपासून वनौषधी संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील आपट्याची जास्तीत जास्त रोपे तयार करून वाटप करण्याचे काम करत आहेत. या वृक्षाचे बी सुद्धा ते वनौषधी प्रेमींना भेट देत आहेत, असे या वेळी दत्तू कोल्हे यांनी सांगितले.

## कामोठ्यात क्रिकेट खेळपट्टीचे भूमिपूजन

**कामोठ : रामप्रहर वृत्त**

रोशन क्रिकेट क्लबचे हेड कोच रोशन आडे यांनी काही दिवसांपूर्वी भाजप व सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत यांच्याकडे क्रिकेट अकादमीसाठी जागेची व सहकार्याची मागणी केली होती. त्यानुसार भगत यांनी अकादमीला कामोठे येथे मैदानासाठी जागा उपलब्ध करून दिली. मैदानावरील क्रिकेट खेळपट्टीचे भूमिपूजन शनिवारी (दि. १६) त्यांच्याच हस्ते करण्यात आले.

कामोठ्यातील मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी व कामोठ्याचे नाव क्रीडा क्षेत्रात मोठे व्हावे म्हणून रोशन क्रिकेट क्लबला तात्पुरत्या स्वरूपात जागा व पीच (खेळपट्टी) बनवण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन प्रदीप भगत यांनी दिले होते. त्यानुसार भगत यांनी कार्यवाही केली व यांच्या हस्ते खेळपट्टीचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी रोशन क्रिकेट क्लबचे खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माळी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

**रसायनी : प्रतिनिधी**

माळी महासंघाच्या कोकण विभागाची सर्वसाधारण सभा नवीन पनवेल येथील सचिन किचन गार्डन येथे नुकतीच झाली. सभेच्या सुरुवातीला माळी महासंघाविषयी माहिती देण्यात आली व काम करण्याची पद्धती समजावून देण्यात आली. त्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी ज्ञानराज शेगेकर, उपाध्यक्षपदी रामदास गायधने, सुरेश जावरकर, सरचिटणीसपदी लीलाधर टाकरखेडे, सचिवपदी अविराज तरार, अतुल मावंदे, कोषाध्यक्ष विनोद पाचघरे, सहकोषाध्यक्ष लोकेश बोराडे, सहसचिव प्रशिंत अढावु, आशिश बेलसरे या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली व भोजनानंतर सभा विसर्जित झाली. या वेळी राष्ट्रीय कोषाध्यक्ष नानासाहेब कांडलकर, विभागीय अध्यक्ष दिनेश टाकरखेडे, विभागिय महासचिव रामेश्वर सुपले, विभागिय सचिव ॲड. माधवराव खेरडे, विभागीय खजिनदार देवेंद्र गौरडे तसेच पनवेलमधील पदाधिकारी उपस्थित होते.



## नवी मुंबईत शासकीय दाखले, योजनांबाबत मोफत शिबिर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भाजप नेते दशरथ सीताराम भगत यांच्या वतीने सुरू करण्यात आलेले नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेला १५ ऑक्टोबर रोजी तीन वर्षे पूर्ण झाली. त्यानुसार संस्थेचे सल्लागार युवा नेते श्री. निशांत भगत यांच्या माध्यमातून जनतेला एक दिवसीय शासकीय दाखले आणि योजनांची सेवा पुरवण्यासाठी मोफत सेवा केंद्र आयोजित करण्यात आले.



या सेवा केंद्रमध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, आरोग्य ओळखपत्र, न्यूनतम पेंशन (वय १८ ते ४०), ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना नोंदणी असे विविध शासकीय दाखले व योजना नागरिकांना मोफत सेवा देण्यास नियोजन करण्यात आले होते. मोफत सेवा केंद्राला जनतेने उत्स्फूर्त त प्रतिसाद देत तब्बल १२०८ नागरिकांनी या शिबिराचे लाभ घेतले.

या वेळी संस्थेचे सल्लागार युवा नेते निशांत भगत, नगरसेविका फशीबाई भगत, सामाजिक कार्यकर्ते संदीप भगत, पदाधिकारी देवेंद्र खडे, विठ्ठलराव यादव, जयसिंग सोनावणे, सचिन शिंदे, दीपक तारी, संतोष पाटील, अविनाश जाधव आदी उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन दरवर्षी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम विद्यालयात वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गेल्या वर्षी हा दिवस ऑनलाइन साजरा करण्यात आला होता. परंतु यंदा आठवी ते दहावी ची शाळा सुरू झाल्यामुळे या वर्षी मोठ्या उत्साहात हा दिवस साजरा झाला.

पर्यवेक्षिका निरजा अदुरी यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तर शिक्षिका मनिषा नारखेडे यांनी उपस्थितांना डॉ. अब्दुल कलाम यांच्या कार्यविषयी माहिती सांगितली. उपस्थितांनी डॉ. अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली. विद्यालयाच्या ग्रंथपाल रूचिता घोलप यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले होते. या निमित्त विद्यार्थ्यांची एक अनोखी स्पर्धा घेण्यात आली. दिलेल्या लेखकांच्या कार्याविषयी आणि साहित्याची माहिती देणारे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादर करण्याची ही स्पर्धा इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन घेण्यात आली.

मराठीतील थोर साहित्यिकांच्या साहित्याची आणि कार्याची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच वाचनाची गोडी निर्माण होऊन वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने आम्ही दरवर्षी वाचनाशी निगडित वैविध्यपूर्ण उपक्रम राबवत असतो, असे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले.




## दसऱ्यानिमित्त आपट्याच्या रोपांची लागवड

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने दसरा सणाचे औचित्य साधून आपट्याच्या रोपाची लागवड केली.

विजयादशमीच्या दिवशी महाराष्ट्रात सोने म्हणून आपट्याच्या पानांची देवाण-घेवाण केली जाते. दसऱ्याला सोन्यासारखा मान असणारे, लुटता येणारे सोने म्हणजे आपटा ही वनस्पती उलवे परिसरातून दिवसेंदिवस दुर्मीळ होत असल्याने आपट्याचे रक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने दसऱ्यानिमित्त आपट्याच्या रोपाची लागवड करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी उलवे सेक्टर २४ श्री हनुमान मंदिर तलाव परिसरालगत रोपण करून दसरा साजरा केला.



सोनेरी पानांचा वनराज आपटा हा खडकाळ माळरानावरही तग धरणारा आदर्श वृक्ष आहे. औषधी गुणधर्म असलेल्या या बहुगुणी वृक्षावर अनेक पक्ष्यांचा अधिवास असतो. त्यामुळे आपटा पर्यावरण दृष्टीने महत्त्वाचा वृक्ष आहे. भारतीय सण आणि निसर्ग यांचे अतूट नाते कायम जपण्यासाठी प्रत्येक सणांना ज्या वृक्षाची आवश्यकता आहे. त्या त्या रोपांची लागवड वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने होत असते आणि ती दरवर्षी केली जाईल, असे मत संस्थेचे अध्यक्ष करण मराडे यांनी मांडले.

या कार्यक्रमास उलवे पोलीस चौकीतील पोलीस नाईक गणेश भालेकर, हवालदार राजेश सुतार आणि वटवृक्ष सामाजिक संस्थेचे धनजंय तांबे, मनोहर चवरकर, गणेश मढवी, अनिल कांबळे आदी उपस्थित होते.

**भारतीय गुंतवणूकदारांच्या गुंतवणूक मार्गात झालेले बदल, विशेषतः एसआयपीच्या मार्गाने दर महिन्याला येणारा पैसा आणि शेअर बाजारातील सध्याच्या तुफानी तेजीचा जवळचा संबंध आहे. जगभर गुंतवणुकीसाठी अवलंबला जात असलेला हा मार्ग भारतीय गुंतवणूकदार स्वीकारताना दिसत आहेत, हे निश्चितच स्वागतार्ह होय.**



# तुफानी तेजीमध्ये असा आहे भारतीयांच्या एसआयपीचा वाटा!

भारतीय नागरिकांच्या गुंतवणुकीच्या मार्गांमध्ये जे बदल होत आहेत, त्यावर अनेक मार्गांनी शिक्कामोर्तब होते आहे. शेअर बाजारातील गुंतवणूक हा आतापर्यंत सर्वसामान्य भारतीय गुंतवणूकदारांच्या दृष्टीने लांबचा विषय होता, पण डिजिटल व्यवहारांना मिळालेली गती, आर्थिक साक्षरतेसाठी होत असलेले प्रयत्न आणि कोरोना संकट यामुळे तोही आता भाग घेताना दिसतो आहे. गेल्या दोन वर्षांत असे सुमारे दीड कोटी गुंतवणूकदार थेट शेअर बाजारात गुंतवणूक करू लागले आहेत. कोरोना संकटामुळे सर्व व्यवहार मंदावले असताना या गुंतवणुकीचा त्यांना आधार वाटला. हा बदल एका धक्क्यातून झाला असला तरी त्याचे स्वागत केले पाहिजे, कारण गुंतवणुकीला सर्वाधिक परतावा देणारा हा मार्ग अजूनही कोट्यवधी गुंतवणूकदारांपासून दूर आहे. पुरेशी माहिती न घेता शेअर बाजारात येणारे नागरिक पैसा गमावून बसतात, ही वस्तुस्थिती आहे, मात्र कधीतरी त्याला तो मार्ग कळला पाहिजे, याविषयी दुमत असू शकत नाही.

**एसआयपीत प्रथमच एवढी वाढ**

अर्थात, सर्वच नवे गुंतवणूकदार शेअर बाजारात थेट उडी घेत नाहीत हेही लक्षात घेतले पाहिजे. याकाळात जेव्हा त्यांना शेअर बाजाराचे आकर्षण वाटले तेव्हा त्यातील बहुतेकांनी शेअर बाजारात अप्रत्यक्ष गुंतवणुकीचा मार्ग निवडला आहे. तो आहे म्युच्युअल फंडाचा. म्युच्युअल फंडात किती नागरिक गुंतवणूक करत आहेत, यासंबंधीची दर महिन्याला आकडेवारी प्रसिद्ध होते. सप्टेंबर २०२१ची अशी आकडेवारी नुकतीच प्रसिद्ध झाली असून ती अतिशय बोलकी आहे. दर महिन्याला ठराविक रक्कम म्युच्युअल फंडामध्ये टाकत राहण्याला सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन म्हणजे एसआयपी म्हटले जाते. गुंतवणुकीचा हा मार्ग जगभर अनुसरला जातो. भारतातही अलीकडच्या काही वर्षांत त्यात सातत्याने वाढ होताना दिसते आहे. गेल्या महिन्यात एसआयपी नोंदणीची संख्या २१ लाखांच्या घरात गेली आहे. ही नोंद नेहमीच्या सरासरीच्या अडीच पट अधिक आहे. २० लाखांच्या वर एसआयपी सुरू होण्याचा हा सलग चौथा महिना आहे हे विशेष. म्हणजे गेल्या चार महिन्यात एसआयपीची संख्या ७७ लाखांच्या घरात गेली आहे. एक एसआयपी म्हणजे प्रत्येक वेळी एक नवा गुंतवणूकदार असे नसते. काही गुंतवणूकदार अनेक एसआयपी करत असतात, असे असले तरी ही वाढ महत्त्वाची आहे, कारण या प्रकारची वाढ भारतात यापूर्वी कधी झालेली नाही.

**विदेशी बाजारांचा प्रभाव कमी झाला**

भारतीय नागरिक शेअर बाजारात वेगवेगळ्या मार्गांनी गुंतवणूक करत आहेत. याचा आणखी एक चांगला पैलू आहे तो म्हणजे भारतीय शेअर बाजार हा पूर्णपणे जगातील इतर बाजारांवर अवलंबून राहात आला आहे. तसेच परकीय गुंतवणूकदारांच्या भांडवलावर त्याची तेजी मंदी ठरत आलेली आहे, मात्र गेल्या सहा महिन्यांत यात थोडा फरक पडला आहे. उदा. परकीय गुंतवणूदार अजून मोठ्या संख्येने भारतीय बाजाराकडे वळले नसल्याने त्यांची गेल्या सहा महिन्यांतील गुंतवणूक फक्त आठ हजार २५९ कोटी रुपये आहे. त्यामुळे बाहेरच्या बाजारांचा भारतीय बाजारावरील प्रभाव कमी झाल्याचे या सहा महिन्यांत पाहायला मिळाले. देशातील गुंतवणूकदारांचा वाटा आतापर्यंत किरकोळ मानला जात होता, तो आता तसा राहिला नाही. ही भारतीय बाजारावरील भारतीय गुंतवणूकदारांचा विश्वास वाढविणारी गोष्ट आहे.

**नव्या गुंतवणूकदारांना इशारा**

अर्थात, हे सर्व आकडे चांगले असले तरी गुंतवणूकदारांनी सावधानतेचा इशारा लक्षात ठेवला पाहिजे. तो म्हणजे बाजार आता इतका वर आहे की तो कधी आणि किती किती खाली येईल, याची चर्चा सुरू झाली आहे. तशा बातम्या काही माध्यमांमध्ये येऊ लागल्या आहेत. त्याचा फटका आपल्याला बसू नये, याची काळजी नव्या गुंतवणूकदारांनी घेतली पाहिजे. काळजी घ्यायची म्हणजे जी रक्कम नजीकच्या काळात लागणार आहे ती बाजारातून काढून घेणे आणि बँकेत असेल, अशी व्यवस्था करणे. ज्यांना नजीकच्या काळात रक्कम नको आहे त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. कारण नवे गुंतवणूकदार, एसआयपी आणि वेग घेत असलेली भारतीय अर्थव्यवस्था बाजार असाच हलता ठेवण्याची व्यवस्था करत आहे आणि यापुढेही करत राहणार आहेत.


**भारताच्या विकासदराची साथ**

आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांनी आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या जीडीपी वाढीचा जो अंदाज (९.५ टक्के) वेळोवेळी जाहीर केला आहे तोही उत्साहवर्धक ठरला आहे. अशा आकडेवारीमध्ये नेहमी इतका फरक असतो की त्यातील कोणती खरी मानावी, असा प्रश्न अनेकदा पडतो, पण योगायोगाने आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था, नाणेनिधी आणि रिझर्व बँक यांनी अंदाज केलेला विकासदर साधारण एवढाच आहे. त्यामुळे त्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. तो जगातील इतर देशांशी तुलना करता सर्वाधिक आहे.शेअर बाजार उद्याचा विचार करतो हे गृहीतक मान्य करावायचे झाले तर शेअर बाजाराला नजीकचा भविष्यकाळ चांगला वाटतो, असे मानण्यास हरकत नाही.

**तेजीचा आणि एसआयपीचा संबंध**

कोरोना संकटातून भारतीय अर्थव्यवस्था वेगाने बाहेर येते आहे, मात्र तिचा वेग काही शेअर बाजारातील तुफान तेजी इतका असू शकत नाही, हे समजण्यासारखे आहे. मात्र त्या तेजीच्या मागेही एसआयपीच्या मार्गाने वाढलेली गुंतवणूक ही कशी आहे, याची प्रचीती आणखी काही आकडे देतात ते असे. एकतर एसआयपीच्या मार्गाने दर महिन्याला शेअर बाजारात सप्टेंबरमध्ये १० हजार ३५१ कोटी रुपये आले. गेले काही महिने हा आकडा आठ ते नऊ हजार कोटी रुपयांच्या मध्ये होता. दुसरे म्हणजे गेल्या पाच वर्षांचा विचार केल्यास यावर्षी या मार्गाने होणारी गुंतवणूक सरासरी २२.८ टक्क्यांनी अधिक आहे. तिसरे म्हणजे या एसआयपींचे व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यांकडे या मार्गाने येणारी रक्कम सातत्याने वाढताना दिसते आहे. या कंपन्यांकडील असा एकूण निधी सप्टेंबरमध्ये ५.४४ लाख कोटींवर गेला आहे. बाजारातील तुफान तेजीचा आणि याचा कसा संबंध आहे पहा. गेल्या सहा महिन्यांत एसआयपीच्या मार्गाने ५६ हजार ४५२ कोटी रुपये बाजारात आले. (त्यातील ९० टक्के रक्कम इक्विटी फंडांत आली आहे.) एसआयपीच्या मार्गाने बाजारात आलेली ही आतापर्यंतची सर्वोच्च रक्कम आहे. बाजारातील तुफान तेजीही गेल्या सहा महिन्यांतील आहे हे लक्षात घ्या.

**अर्थ प्रहर**



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)




# आणखी एक ई-कॉमर्स कंपनी भागविक्रीसाठी सज्ज!

***इंटरनेटचा वापर आणि त्या माध्यमातून होणारी सध्याविक्री वाढत चालली असून तिचा लाभ आपल्या उत्पादनांना व्हावा, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यातीलच एक म्हणजे ओम्नी चॅनेल. त्याचा वापर करून मोठी होत असलेली ब्युटी व कंझ्युमर केअर प्रॉडक्ट्स कंपनी 'नायका' भागविक्रीसाठी सज्ज झाली आहे.***

दसरा आणि दिवाळीसारखे सण म्हटलं की, एकूणच घराघरांत उत्साहाचं वातावरण असतं. दसऱ्याच्या निमित्तानं सोनं खरेदी व इतर मुहूर्ताची खरेदी होऊन हे सत्र दिवाळीपर्यंत चालू राहतं. शेअर बाजारदेखील या गोष्टींचं भान ठेऊन असतो. आपसूकच सणासुदीच्या दिवसांत वाढणारी खरेदीही व्यापाऱ्यांसाठी, पुरवठा साखळीसाठी, उत्पादकांसाठी, कच्चा माल पुरवठादारांसाठी आणि अर्थसहाय्यकांसाठी अनेक सकारात्मक गोष्टी आणत असते. त्याचप्रमाणं शेअर बाजारामध्येदेखील येत्या एक-दोन महिन्यांत अनेक कंपन्या आपली प्राथमिक समभाग विक्री करण्यास चढाओढ लावून आहेत. त्यामधील प्रमुख आणि सर्वांच्याच परिचयाच्या दोन कंपन्या म्हणजे नायका आणि पेटीम. त्यातील नायकाबद्दल या वेळी चर्चा करू.

अगदी परवाच भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अखत्यारीतील देशाच्या सिक्युरिटीज आणि कमॉडिटी मार्केटसाठी असलेल्या नियामक संस्थेनं (सेबी) प्राथमिक समभाग विक्रीसाठी नायका कंपनीस सुधारित डीआरएचपी दाखल करण्यासाठी परवानगी दिली. म्हणजे ड्राफ्ट (मसुदा) रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस, ज्याला ऑफर डॉक्युमेंट असंही म्हटलं जातं. बुक बिल्डिंगद्वारे आपल्या शेअर्सची प्राथमिक समभाग विक्री करू पाहणाऱ्या कंपन्यांसाठी त्यांचे मर्चंट बँकर्स प्राथमिक नोंदणी दस्तऐवज तयार करतात.

तर, ओम्नी-चॅनेल सौंदर्य आणि ग्राहक-काळजी उत्पादनांचा (ब्युटी व कंझ्युमर केअर प्रॉडक्ट्स) किरकोळ विक्रेता असणारी कंपनी नायका (Nykaa) अंदाजे ४००० कोटी रुपयांचा प्राथमिक इश्यू आणण्याच्या विचारात आहे. ज्यामध्ये ऑफर फॉर सेल (OFS)देखील समाविष्ट असेल ज्याद्वारे विद्यमान भागधारक जसे की, कंपनीचे प्रवर्तक संजय नायर फॅमिली ट्रस्ट ४८ लाख तर इतर कंपनीतील मोठे गुंतवणूकदार टीपीजी, लाईट हाऊस इंडिया फंड, जेएम फायनॅन्शिअल्स, योगेश एजन्सीज आणि इतर वैयक्तिक गुंतवणूकदार मिळून एकूण ४३१.१ लाख शेअर्स विकतील. प्राथमिक समभाग विक्री पश्चात संस्थापक फाल्गुनी नायर आणि तिचं कुटुंब हे प्रमुख भागधारक राहतील. ज्यांचा कंपनीमधील हिस्सा ५३ टक्के पेक्षा जास्त आहे.



**ओम्नी चॅनेल म्हणजे नक्की काय?**

या कंपनीकडं वळण्याआधी आपण समजून घेऊ की, ओम्नी चॅनेल म्हणजे नक्की काय? आज आपण प्रत्येक जण या ना त्या कारणानं इंटरनेटशी जोडले गेलेलो आहोत. अनेक वेबसाईट ब्राउझ करण्याशिवाय आपण युट्यूब, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर इत्यादी गोष्टी अव्याहतपणे हाताळत असतो. आता कोणत्याही व्यवसायाचा प्रमुख उद्देश असतो विक्री आणि आपल्या ग्राहकांना सांभाळणं आणि नवनवीन ग्राहक जोडणं. आज वर उदाहरण दिलेले सोशल मीडिया केवळ मीडिया न राहून डिजिटल मार्केटर्ससाठी चॅनेल्स बनलेले आहेत आणि अशाप्रकारे प्रत्येक शक्य असलेल्या प्लॅटफॉर्मवर हजर (प्रेझेन्स) राहणं व आपल्या कंपनीची अथवा आपल्या उत्पादनांची जाहिरात करणं यालाच म्हणतात ओम्नी चॅनल प्रेझेन्स आणि मार्केटिंग, जे आजच्या युगात खूपच मस्ट आहे. समजा तुमच्या कंपनीच्या उत्पादनाची जाहिरात केवळ फेसबुक व इंस्टावरच येत असेल आणि तुमच्या स्पर्धकाच्या तत्सम उत्पादनांची जाहिरात मात्र प्रत्येक सोशल मीडिया चॅनेलवर झळकत असेल (पॉप अप) तर साहजिकच एक उत्सुकता म्हणून त्या जाहिराती उघडल्या जाऊ शकतात आणि तुमच्या ग्राहकास दुसरा पर्याय प्राप्त होतो. सुरुवातीस कोणताही ग्राहक तुमच्या वेबसाईटला एकदा भेट देतो व तो त्याच्या मागणीनुसार उत्पादनं तपासतो आता त्यानंतर तुमच्या प्रणालीचं अथवा व्यवस्थेचं काम आहे, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) प्लॅटफॉर्म वापरून त्या ग्राहकाचा रस कोणकोणत्या गोष्टींमध्ये आहे ते समजून त्यास विविध चॅनेल्सवरून तत्सम जाहिराती दाखवत राहणं आणि त्यास स्वतःच्या कंपनीस जोडून ठेवणं (re-marketing). तर अशी ही ओम्नी चॅनेल्सद्वारे लोकांसमोर आपली प्रसाधनांची व पर्सनल केअर उत्पादनांची मालिका सादर करणारी नायका ही भारतीय कंपनी.






प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

**७६ ऑफलाइन स्टोअर**

ही एक भारतीय ई-कॉमर्स कंपनी असून फाल्गुनी नायर, ज्या आधी कोटक महिंद्र कॅपिटलमध्ये मॅनेजिंग डायरेक्टर पदावर कार्यरत होत्या त्यांनी ह्या कंपनीची २०१२ मध्ये स्थापना केली. कंपनी ओम्नी चॅनेल्सखेरीज आपल्या ७६ ऑफलाइन स्टोअरमध्ये सौंदर्य, निरोगीपणा आणि फॅशन संबंधित उत्पादनांची विक्री करते. २०१५ मध्ये कंपनीनं केवळ ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून ओम्नी चॅनेल मॉडेलमध्ये विस्तार केला आणि सौंदर्य उत्पादनांव्यतिरिक्त इतर विक्री करण्यास सुरुवात केली. २०१८ मध्ये कंपनीनं पुरुषांच्या ग्रूमिंगसाठी भारतातील पहिलं मल्टी-ब्रँड ईकॉमर्स स्टोअर 'Nykaa man' लॉन्च केले. कंपनीनं Nykaa Design Studio सुरू करून फॅशनच्या दालनामध्ये विस्तार केलाम नंतर ज्याचं नाव बदलून Nykaa Fashion केलं गेलं. २०२० मध्ये कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर २००० पेक्षा जास्त ब्रॅण्ड्स आणि दोन लाखांपेक्षा जास्त उत्पादनं विक्रीस उपलब्ध आहेत. कंपनीचे NykaaLuxe, Nykaa On Trend आणि Nykaa beauty Kiosks असे तीन ऑफलाइन स्टोअर फॉरमॅट आहेत. लक्स फॉरमॅटमध्ये हुडा ब्यूटी, एमएसी, डायर आणि गिवेंचीसारख्या आंतरराष्ट्रीय लक्झरी ब्यूटी ब्रॅण्ड्स आहेत, ज्यामध्ये नायका ब्यूटी, सौंदर्य उत्पादनांचादेखील संग्रह आहे. Nykaa On Trend फॉरमॅटमध्ये श्रेणीनुसार निवडलेली लोकप्रिय उत्पादनंच आहेत. भारतात, Nykaa एकमेव किरकोळ विक्रेता आहे जे e.l.f, Charlotte Tilbury, Tonymoly, Becca, Sigma, Limecrime, Dermalogica, and Murad यासारख्या आंतरराष्ट्रीय ब्रॅंडची विक्री करते. याव्यतिरिक्त नायकामध्ये सौंदर्य आणि फॅशन अंतर्गत स्वतःच्या (In-house) ब्रॅंडचीदेखील मालिका आहे. त्यापैकी Nykaa Naturals, Nykaa Cosmetics, Kay Beauty तर Nykaa फॅशन अंतर्गत, Nykd by Nykaa, २० Dresses, RSVP, Mondano, Likhad Pipa Bell यांचादेखील समावेश होतो. नायका नॅचरल्स पोर्टफोलिओ हा स्किनकेअर आणि पर्सनल केअर उत्पादनांचा संग्रह आहे. २०१९च्या सुरुवातीस, ब्रॅंडनं आपले वंडरलस्ट बाथ आणि बॉडी कलेक्शन लॉंच केले आणि नंतरच्या वर्षात नायकाद्वारा आयकॉनिक डिझायनर मसाबा गुप्ता हिच्या नांवासह ब्यूटी लाइन सादर केली.

**तोट्यातून फायद्यात आलेली कंपनी**

नायका ही भारतातील अनेक रिटेलर्समधील एक अशी कंपनी आहे जी नफ्यामध्ये आहे. आर्थिक वर्ष २० मधील १६.३४ कोटी रुपयांच्या निव्वळ तोट्याच्या तुलनेत वित्त वर्ष २१ मध्ये ६१.९६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला गेलेला आहे. आर्थिक वर्ष २१ मध्ये कंपनीची त्याची कमाई ३८ टक्के वाढून २४५३ कोटी झाली आहे जी २०२० मध्ये १७०० कोटी रुपयांच्या आसपास होती तर २०१९ मध्ये हीच आकडेवारी केवळ ११०० कोटी रुपयांच्या आसपास होती. गेल्या दोन वर्षांमध्ये कंपनी ही तोट्यात असल्यानं एकूण समभाग विक्रीपैकी ७५ टक्के भाग हा क्वालिफाईड इंस्टिट्युशनल बायर्स (QIB) साठी राखून ठेवण्यात येईल तर केवळ १० टक्के भाग हा किरकोळ गुंतवणूकदारांसाठी (दोन लाखांपर्यंत) असेल. नक्कीच नायका त्यांच्या ग्राहकांव्यतिरिक्त गुंतवणूकदारांच्यादेखील पसंतीस उतरणार यात शंकाच नाही.

**सुपरशेअर : टाटा टेक्नॉलॉजीज**

*मागील आठवड्यात टाटा ग्रुपच्या 'पांचो उंगलीयां घी में' अशी परिस्थिती होती. एअर इंडियासाठीची बोली जिंकल्यानंतर टाटा समूहाच्या सर्वच कंपन्यांनी जोरदार तेजी नोंदवली. टाटा मोटर्स, टाटा मोटर्स डीव्हीआर व टाटा पॉवर हे शेअर्स आघाडीवर होते. टीपीजी राईज क्लायमेट फंडनं टाटा मोटर्सच्या नव्या उपकंपनीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी करार केला आणि त्याचा परिणाम टाटा मोटर्स व इतर इलेक्ट्रिक व्हेईकल संबंधित टाटाच्या कंपन्यांवर झाला (टाटा पॉवर, टाटा केमिकल्स, टाटा स्टील, इत्यादी). याव्यतिरिक्त टाटा समूहाची आणि टाटा मोटर्सची उपकंपनी असलेली टाटा टेक्नॉलॉजीजच्या शेअरनादेखील अनलिस्टेड मार्केट मध्ये जोरदार मागणी दिसली. गेल्या दोन महिन्यांत या शेअरची किंमत २३०० रुपयांवरून वाढून ४८०० रुपये झालेली आढळून येतेय. या कंपनीचा ७४ टक्के हिस्सा हा टाटा मोटर्सकडं असून येत्या दोन ते तीन वर्षांत कंपनी जोरदार वाढ दर्शवण्याच्या तयारीत आहे. 'या क्षणी आमच्या जवळजवळ सर्व उत्पादन विकास उपक्रमांमध्ये काही प्रकारचे विद्युतीकरण आहे. आम्ही करत असलेले बरेचसे काम खरोखरच इलेक्ट्रिकल आर्किटेक्चर तयार करण्याविषयी आहे जे प्रवासी आणि ड्रायव्हरच्या अनुभवाच्या प्रकाराला समर्थन देते आणि आमचे बरेच ग्राहक त्यासंबंधानं रणनीती आणि योजना तयार करत आहेत.' टाटा टेक्नॉलॉजीज कंपनीचे सीईओ वॉरेन हॅरिस यांनी असं म्हटलंय. यावरून या कंपनीस महत्त्व प्राप्त होताना दिसतंय आणि ही कंपनी नक्कीच येत्या काही वर्षांत टाटा मोटर्सच्या यशाचा हिस्सा असेल यात वाद नाही. अशा अनलिस्टेड कंपन्यांचे शेअर्स कायदेशीररित्या विकत घेता येऊ शकतात.*

# रस्त्यासाठी आदिवासींचा रास्ता रोको

## नेरळ-माथेरान घाटरस्त्यावर आंदोलन

**कर्जत : बातमीदार**

वन जमिनीच्या अडथळ्यामुळे माथेरानच्या डोंगरात असलेल्या आदिवासी वाड्यांना जाणारा रस्ता रखडला आहे. वर्षानुवर्षे रस्त्याची मागणी पुर्ण होत नसल्याने या पाच आदिवासी वाड्यांमधील लोकांनी शनिवारी (दि. १६) नेरळ-माथेरान घाटरस्त्यावरील वाहतूक अर्धा तास बंद पाडली. या वेळी महिलांनी आदिवासी नृत्य करीत आंदोलन अधिक काळ टिकवून ठेवले.

माथेरानच्या डोंगरात असलेल्या जुम्मापट्टी धनगरवाडा, बेकरेवाडी, आसलवाडी, नाण्याचा माळ आणि मन्या धनगरवाडा या आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता शासन करीत नाही. त्यामुळे स्थानिक आदिवासी लोकांनी श्रमदान करून आपल्या वाडीत पोहचण्यासाठी रस्ता तयार केला आहे. मात्र हा रस्ता दरवर्षी पावसाळ्यात


(छाया : संतोष पेरणे)

वाहून जातो. त्यामुळे या भागातील लोकांची आणि विद्यार्थ्यांची गैरसोय होते. स्थानिक आदिवासी कार्यकर्ते जैतु पारधी आणि गणेश पारधी यांनी रस्त्यासाठी आतापर्यंत चारवेळा उपोषणे केली आहेत. मात्र आजपर्यंत रस्ता होऊ शकला नाही. त्यामुळे या आदिवासी लोकांनी नेरळ-माथेरान घाटरस्त्यावर शुक्रवारी रस्ता रोको आंदोलन केले. या वेळी आंदोलनकर्त्या महिलांनी रस्त्यावर आदिवासी नृत्ये आणि गाणी सादर केली. शनिवार असल्याने मोठ्या प्रमाणावर पर्यटक माथेरान येथे या घाटरस्त्याने जात होते. रास्ता रोकोमुळे त्या पर्यटकांची वाहने सुमारे अर्धा तास थांबून राहिली होती.

आदिवासी सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष बुधाजी हिंदोळा, जिल्हा सरचिटणीस गणेश पारधी, जिल्हा उपाध्यक्ष भगवान भगत, विभागीय अध्यक्ष सुरेश दरवडा, ग्रामस्थ बाळू पारधी, बुधाजी निरूगडे, बुधाजी पारधी, बाळू सांबरी, लक्ष्मण सांबरी, जोमा निरगूडे, सुनिल पारधी यांच्यासह महिला या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. नेरळ पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता तयार करण्यासाठी शासनाच्या प्रतिनिधींना तात्काळ सुचविले जाईल, असे आश्वासन देवून पोलीस निरीक्षक तेंडुलकर यांनी या वेळी आदिवासी लोकांना आंदोलन थांबवण्याचे आवाहन केले.

# देशभक्ती रूजविण्याचे काम रा.स्व.संघ करतो -सुजित टिळक

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रत्येक भारतीयाच्या मनात शाखेच्या माध्यमातून देशभक्ती रुजविण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ करीत आहे. शतक किंवा शतकोत्तर सोहळे साजरे करण्यात संघाला स्वारस्य नाही, तर हा देश लवकरात लवकर परम वैभवाला नेऊन समाज व संघ कसा एकरूप होईल हे संघाचे उद्दिष्ट स्वयंसेवकाला पहावयास आवडेल, असे प्रतिपादन संघाचे जिल्हा कार्यवाह सुजित टिळक यांनी शुक्रवारी (दि. १५) खोपोली येथे केले.

रा. स्व. संघाचा स्थापनादिन व विजयादशमी उत्सवाच्या निमित्ताने शुक्रवारी खोपोलीतील ब्राह्मण सभा सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुजित टिळक प्रमुख वक्ते म्हणून बोलत

खोपोलीत विजयादशमी उत्सव साजरा


(छाया : विनायक माडपे)

होते. संघाचे काम सर्व क्षेत्रात असल्यामुळे संघ व समाज हे वेगवेगळे नसल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

आचार, विचार, व्यवहार व विस्तार या चारसूत्रीवर आधारित संघाचे कार्य चालते असे सांगून टिळक यांनी संघाच्या कार्यपद्धतीबाबत विस्तृत माहिती दिली. संघाचे खालापूर तालुका कार्यवाह अविनाश मोरे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी ध्वजारोहण झाल्यानंतर, वैयक्तिक पद्य अमृतवचन स्वयंसेवकांनी सादर केले. त्यानंतर स्वयंसेवकांनी देशभक्तीवर गीते सादर करीत शहराच्या विविध भागातून पथसंचलन केले. अनेक ठिकाणी स्वागत करण्यात आले. पथसंचलन सुरू असताना ज्येष्ठ स्वयंसेवकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले.

# शिवभक्तांनी बांधले अलिबागच्या कुलाबा किल्ल्याला तोरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

इतिहासाची साक्ष म्हणून अलिबाग समुद्रात उभा असलेल्या कुलाबा किल्ल्यावर विजयादशमीच्या मुहूर्तावर शुक्रवारी (दि. १५) शिवभक्तांनी गोंड्याच्या फुलांचे तोरण बांधले. तसेच किल्ल्यातील तोफांचेही यथासांग पूजन केले.

अलिबागमधील गडवाट प्रवास सह्याद्रीचा, स्वराज्याचे शिलेदार, मावळा प्रतिष्ठान या संस्थांचे सदस्य दरवर्षी कुलाबा किल्ल्याला तोरण बांधून आणि शस्त्रपूजन करून दसरा सण साजरा करतात. किल्ल्याचा इतिहास नव्या पिढीला समजावा, किल्ल्याचे जतन आणि संवर्धन व्हावे या उद्देशाने हे शिवभक्त एकत्रित



येऊन आपले कार्य करीत असतात.

कुलाबा किल्ला हा सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या आरमाराचे प्रमुख ठिकाण होते. काळानुरूप काही भागात कुलाबा किल्ल्याची पडझड झाली आहे, असे असले तरी किल्याचे प्रवेशद्वार आजही मजबूत आहे. मावळा प्रतिष्ठान, गडवाट प्रवास सह्याद्रीचा, स्वराज्याचे शिलेदार या संस्थांच्या सदस्यांनी शुक्रवारी कुलाबा किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर तसेच बुरुजावरही गोंड्याच्या फुलांचे तोरण लावले. तोफा व शस्त्रांचेही पूजन केले.

# रोह्यात श्री धावीर महाराजांचा पालखी उत्सव

**रोहे : प्रतिनिधी**

ग्रामदैव श्री धावीर महाराज पालखी उत्सवाला शनिवारी (दि. १६) पहाटे सुरुवात झाली. मंदिरात धार्मिक विधी, पूजा, आरती झाल्यानंतर रायगड पोलीस दलाच्या वतीने रोह्याचे निरीक्षक संजय पाटील आणि पोलीस पथकाने श्री धाविर महाराजांना सशस्त्र सलामी दिली. पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार अनिकेत तटकरे आदींनी दर्शन घेतल्यानंतर पारंपारिक वाद्यांच्या गजरात रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज यांचा पालखी उत्सव सुरू झाला.

श्री धावीर महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रशांत देशमुख व उत्सव समिती अध्यक्ष शैलेश




(छाया : महादेव सरसंबे)

सशस्त्र पोलीस दलाची मानवंदना

कोळी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. रोहे शहरात ठिकठिकाणी पालखीच्या स्वागतासाठी स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. जागोजागी सुबक व आकर्षक रांगोळ्याही काढण्यात आल्या होत्या. पालखी मार्गावर अनेक ठिकाणी पुष्पवर्षाव करून पालखीचे स्वागत करण्यात आले. सर्व जातीधर्मांतील भाविकांनी श्री धावीर महाराजांचे दर्शन घेत पूजा केली. कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत हा पालखी उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात सुरू आहे.

नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगराध्यक्ष भाजप नेते संजय कोनकर, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते, सरचिटणीस मिलिंद पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष अमित घाग, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर पाटील, शहर अध्यक्ष अमित उकडे, शिवसेनेचे तालुका प्रमुख समीर शेडगे, लालताप्रसाद कुशवाह, सुभाष राजे, अ‍ॅड. सुनील सानप, नगरसेवक महेंद्र गुजर, महेश कोल्हटकर, राजेंद्र जैन, समीर सकपाळ, महेंद्र दिवेकर, पूजा पोटफोडे, प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने, उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, तहसीलदार कविता जाधव यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी आणि नागरिक या वेळी उपस्थित होते.

श्री धावीर महाराज देवस्थान ट्रस्ट व उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते हा पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेत आहेत.



# नेरळ-माथेरान मार्गावरील रूळ बदलण्याचे काम युद्धपातळीवर

**कर्जत : बातमीदार**

जुलै महिन्यात जोरदार पावसामध्ये नेरळ-माथेरान मिनीट्रेनच्या रुळावर ठिकठिकाणी दरडी कोसळल्या होत्या. त्यामुळे या रेल्वे मार्गाचे मोठे नुकसान झाले आहे. या रेल्वे मार्गावर कोसळलेल्या दरडी हटविण्यात आल्या असून, त्या ठिकाणी रूळ बदलण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात येत आहे.

माथेरानमध्ये १८ ते २३ जुलैदरम्यान ११५७ मिलिमीटर पाऊस झाला होता. त्यावेळी वॉटरपाईप स्थानकाच्या वरच्या बाजुच्या मिनीट्रेन मार्गावर महाकाय दरड कोसळली होती. दरडीबरोबरच प्रामुख्याने मोठे काळे दगड आणि गोटा दगड तसेच चिकट माती रेल्वे मार्गावर आली होती. मध्य रेल्वेने तात्काळ ठेकेदाराकरवी दरड हटविण्याचे काम सुरू केले. मात्र रेल्वे रुळावरील दगड, गोटे तसेच चिकट माती हटविण्यासाठी ठेकेदाराला तब्बल दोन महिने लागले. आता ही दरड हटवून मिनीट्रेनेचा मार्ग मोकळा केला आहे.

दरड कोसळल्याने रूळ खराब झाले होते. ते बदलण्याच्या कामास सुरुवात झाली आहे. दरम्यान, विजांचा लखलखाट आणि ढगांच्या गडगडाटासह परतीचा पाऊस हजेरी लावत असल्यामुळे रूळ बदलण्याचे काम रखडले होत, ते येत्या बुधवारपर्यंत पूर्ण होईल, असे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले.

पावसाळ्यात नेरळ-माथेरान मिनिट्रेन मार्गावर काही ठिकाणी दरडी पडल्या होत्या तर काही ठिकाणी रुळाखालाची माती वाहून गेली आहे. त्यामुळे मिनिट्रेन सेवा सुरू होण्यास विलंब होत आहे. ही सर्व कामे उरकण्यासाठी आणखी काही दिवस लागणार आहेत. त्यामुळे नेरळ-माथेरान मिनिट्रेनसाठी आणखी काही काळ धीर धरावा लागणार आहे.

# माणगावातील शाळांमध्ये हात धुणे दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील होडगांव, होडगाव कोंड, आदिवासीवाडी, खर्डी, हातकेली आणि मुगवली येथील प्राथमिक शाळांमध्ये शुक्रवारी (दि. १५) जागतिक हात धुणे दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक हात धुणे दिन म्हणून साजरा करण्यात येतो. माणगाव तालुक्यातील होडगांव येथील आई कनकाई सामाजिक संस्थेच्या वतीने शुक्रवारी होडगांव, होडगाव कोंड, आदिवासीवाडी, खर्डी, हातकेली व मुगवली येथील प्राथमिक शाळांमध्ये जागतिक हात धुणे दिन साजरा करण्यात आला. या वेळी युनिसेफ आणि सीएसीआर या संस्थांच्या सहयोगाने शाळकरी मुलांना साबण

(छाया : सलीम शेख)



वाटप करण्यात आले.

संस्थेच्या सदस्यांनी उपस्थितांना हात धुण्याची पद्धत समजावून सांगितली. तसेच काही ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांकडून हात धुण्याची प्रात्यक्षिकेदेखील करून घेतली. होडगांवचे उपसरपंच शंकर खाडे, ग्रामसेवक नरेश तरडे, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि परिसरातील ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात होडगाव-घरोशी रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक प्रवासी व व्यक्तींना हात धुण्याचे महत्व पटवून देऊन संस्थेकडून त्यांना साबणाचे वाटप करण्यात आले. त्याचा लाभ १२००पेक्षा जास्त लोकांनी घेतला.

# सुभाष टेंबे यांचा माणगावात सत्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार मिळाल्याबद्दल लोणेरे येथील जे. बी.सावंत हायस्कूलचे लेखनिक सुभाष टेंबे यांचा गुरुवारी (दि. १४) माणगाव येथे पन्हळघर परिसर शिक्षण प्रसारक मंडळातर्फे कार्यवाह रामदास पुराणिक यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये झालेल्या या



कार्यक्रमाला भाऊसाहेब सावंत, प्रा. हर्षल जोशी, दिलीप ढेपे, संजय अशोक गायकवाड यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# रोहा ग्रंथालय समितीतर्फे वाचन प्रेरणा दिन

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशनच्या धाटाव येथील महिला महाविद्यालयात रोहा ग्रंथालय समितीतर्फे शुक्रवारी (दि. १५) वाचक प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

माजी राष्ट्रपती ए.पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा

(छाया : महादेव सरसंबे)



केला जातो. यानिमित्त महिला महाविद्यालयातील ग्रंथालयात नियमित पुस्तके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्र वाचनाकरिता जास्तीतजास्त उपस्थिती नोंदविणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थिनींचा गौरव करण्यात येतो. या वेळी दीपेश भोसले यांना ग्रंथालयात सर्वाधिक उपस्थितीबाबत पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, ग्रंथपाल निर्मला थोरात, प्रा. नितेश मोहिते, प्रा. मयूर पाखर यांच्यासह सर्व प्राध्यापक या कार्यक्रमास उपस्थित होते.


(छाया : संजय करडे)

# मुरूडमध्ये एकविरा देवीचे वाळूशिल्प

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील शीघ्रे ग्रामपंचायत हद्दीत राहणारे अनिकेत जयवंत मांदाडकर यांनी मुरूड येथील समुद्रकिनारी एकविरा देवीचे वाळू शिल्प काढून सर्वांचे लक्ष्य वेधले आहे.

अनिकेतला लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. चित्र काढता काढता त्याने युट्युबवर वाळू शिल्प काढण्याची कला आत्मसात केली. ते मुरूड नेहमी समुद्रकिनारी वेगवेगळी वाळूशिल्प काढत असतात. आतापर्यंत त्यांनी जलपरी, भगवान शंकरांची मूर्ती काढली होती. नवरात्रौत्सवानिमित्त त्यांनी समुद्रकिनारी एकविरा देवीचे वाळू शिल्प काढले आहे. त्यासाठी त्यांना सात बाय सातचा भूभाग व्याप्त केला होता.

सर्वप्रथम त्यांनी वाळूने फ्रेम तयार केली व त्यानंतर एकविरा देवीची मूर्ती साकारली. त्यांचे दोन सहकारीसुद्धा मदतीला होते. सदरील वाळू शिल्प साकारण्यासाठी अनिकेत यांना साडेपाच तासाचा अवधी लागला. तेव्हा हे वाळूशिल्प साकार झाले.

दसऱ्याच्या दिवशी देवींचे विसर्जन करण्यासाठी मुरूड समुद्रकिनारी गर्दी होते. त्या वेळी भाविकांना या एकविरा देवीच्या वाळू शिल्पाचे दर्शन झाले.


## जाहीर नोटीस

माझे अशील सौ. अरुणा मधुकर घरत, रा. जासई, ता. उरण, जि. रायगड यांच्या मालकीच्या फ्लॅट नं. १२०४, बारावा मजला, आत्मय एलिक्सर, प्लॉट नं. सी-४, सेक्टर-८, उलवे, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६ या सदनिकेचे ०९.०७.२०२१ रोजीचे मे. आत्मय रिअल्टर्स तर्फे अजिंक्य अनंत घरत आणि सौ. अरुणा मधुकर घरत यांच्यामध्ये झालेले चूक दुरुस्ती पत्र सब रजिस्ट्रार ऑफीस पनवेल-३ येथे दि. ०९.०७.२०२१ रोजी नोंदणीकृत झाले असून त्याचा नोंदणी क्र. पवल-३-१०८६७-२०२१ असा आहे. तरी सदर दस्त दि. ०९.१०.२०२१ रोजी जासई ते उरण परिसरातून गहाळ झाले आहे. सदर दस्त गहाळ झाल्याची नोंद उरण पोलीस स्टेशनमध्ये दि. १२.१०.२०२१ रोजी प्रॉ.मि.रजि.नं. ०८९०/२०२१ नुसार केली आहे. तरी सदर दस्त कोणास सापडला असल्यास खालील पत्त्यावर त्वरित संपर्क साधावा.

**पत्ता : शॉप नं. ०१, एन. एल. १ बी,**
**८५/६, श्री. गणेश अपार्टमेंट,**
**सेक्टर-१०, नेरूळ, नवी मुंबई-४००७०६**
**दिनांक :- १७.१०.२०२१**
**मो.नं. ८८५०८३२९२९**

**सही/-**
**अशिलातर्फे वकील**
**सोनाली भा. पाटील**

# चेन्नईचा जेतेपदाचा चौकार

## आयपीएलच्या अंतिम सामन्यात कोलकातावर मात

**दुबई : वृत्तसंस्था**

फॅफ ड्यू प्लेसिसच्या (८६) उत्कृष्ट फलंदाजीनंतर शार्दूल ठाकूरने (३/३८) केलेल्या भेदक माऱ्यामुळे चेन्नई सुपर किंग्जने अंतिम सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सला २७ धावांनी धूळ चारत इंडियन प्रीमियर लीग क्रिकेटच्या १४व्या हंगामाचे जेतेपद पटकावले. महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या चेन्नईचे हे चौथे आयपीएल जेतेपद ठरले.



दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात चेन्नईने दिलेल्या १९३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना कोलकाताला २० षटकांत ९ बाद १६५ धावाच करता आल्या. दोन वेळा विजेत्या कोलकाताची आयपीएलचा अंतिम सामना गमावण्याची ही पहिलीच वेळ होती. यंदा उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वेंकटेश अय्यर (५०) आणि शुभमन गिल (५१) या युवा सलामीवीरांनी आक्रमक शैलीत फलंदाजी केली, परंतु शार्दूलने सलग दोन चेंडूंत अय्यर आणि नितीश राणा यांना बाद केले तसेच दीपक चहरने गिलला पायचीत केले. त्यामुळे बिनबाद ९१ अशा धडाकेबाज प्रारंभानंतर कोलकाताने २४ धावांत आठ बळी गमावले आणि त्यांच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या.

तत्पूर्वी, 'एलिमिनेटर' आणि 'क्वालिफायर-२'च्या सामन्यात धावांचा यशस्वी पाठलाग करणाऱ्या कोलकाताने नाणेफेक जिंकून गोलंदाजी स्वीकारल्यावर चेन्नईने २० षटकांत ३ बाद १९२ अशी धावसंख्या उभारली. फॅफ (८६) आणि ऋतुराज गायकवाड (३२) यांनी चेन्नईला चांगली सुरुवात मिळवून दिली. त्यांनी आठ षटकांत ६१ धावांची भागीदारी रचल्यावर फिरकीपटू सुनील नारायणने ऋतुराजला माघारी पाठवले. मग फॅफला रॉबिन उथप्पाची (३१) उत्तम साथ लाभली. उथप्पाने फिरकी त्रिकुटाच्या गोलंदाजीवर प्रत्येकी एक षटकार मारला, मात्र नारायणच्या गोलंदाजीवर तो पायचीत झाला. फॅफ आणि मोईन अली (नाबाद ३७) यांनी अखेरच्या पाच षटकांत फटकेबाजी करीत ६१ धावा काढल्याने चेन्नईने १९० धावांचा टप्पा ओलांडला. फॅफने ५९ चेंडूंत ८६ धावांची खेळी करताना सात चौकार व तीन षटकार मारले.

**ऑरेंज कॅप :** ऋतुराज गायकवाड (चेन्नई) : ६३५ धावा
**पर्पल कॅप :** हर्षल पटेल (बंगळुरू) : : ३२ बळी

### संक्षिप्त धावफलक

**चेन्नई सुपर किंग्ज :** २० षटकांत ३ बाद १९२ (फॅफ ड्यू प्लेसिस ८६, मोईन अली नाबाद ३७, ऋतुराज गायकवाड ३२; सुनील नारायण २/२६) विजयी वि. **कोलकाता नाइट रायडर्स** २० षटकांत ९ बाद १६५ (शुभमन गिल ५१, वेंकटेश अय्यर ५०; शार्दूल ठाकूर ३/३८, जोश हेझलवूड २/२९).



# युवा क्रिकेटपटू अवि बरोटचे निधन

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

भारताच्या अंडर-१९ संघाचा माजी कर्णधार अवि बरोटचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. २९ वर्षीय अवि सौराष्ट्रकडून खेळत होता.

अविने या वर्षी सय्यद मुश्ताक अली करंडकात शानदार शतक झळकावले होते. या व्यतिरिक्त तो २०१९-२०मध्ये रणजी करंडक जिंकलेल्या सौराष्ट्रच्या विजेत्या संघाचा भाग होता. अवि बरोट यष्टीरक्षक फलंदाज होता. कधीकधी तो गोलंदाजीही करायचा. त्याने आपल्या कारकिर्दीत ३८ प्रथम श्रेणी सामने, ३८ लिस्ट ए सामने आणि २० स्थानिक टी-२० सामने खेळले. बरोटने आपल्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत एक शतक आणि नऊ अर्धशतकांच्या मदतीने १५४७ धावा केल्या होत्या. लिस्ट ए सामन्यांमध्ये आठ अर्धशतकांच्या मदतीने १०३० धावा केल्या गेल्या. बरोट टी-२० क्रिकेटचा स्फोटक खेळाडू होता. त्याने देशांतर्गत टी-२०मध्ये एक शतक आणि पाच अर्धशतकांच्या मदतीने ७१७ धावा केल्या. टी-२०मध्ये त्याचा स्ट्राइक रेट १४६ आणि सरासरी ३८च्या आसपास होती.

२०१०-११च्या कूचबिहार करंडकात गुजरातसाठी चार शतके आणि तीन अर्धशतके ठोकल्याबद्दल बरोटला बीसीसीआयने अंडर-१९ क्रिकेटर ऑफ द इयरचा पुरस्कार दिला होता.

## आरोग्य प्रहर

# जेवल्यानंतर चहा पिणे आरोग्यास हानीकारक

दिवसाची सुरुवात करायची असो वा दिवसभराचा थकवा दूर करायचा असो चहावर प्रेम करणाऱ्यांसाठी प्रत्येक त्रासापासून मुक्त होण्याचे जणू हे औषध आहे, परंतु आपणही अशा लोकांमध्ये असाल जे जेवण झाल्यानंतर लगेच चहा पितात किंवा चहा पिण्याची अत्यंत आवड असेल तर आजपासून ही सवय बदला. होय, चहामध्ये असलेले कॅफिन शरीरात कोर्टिसोल किंवा स्टिरॉइड संप्रेरक वाढवून आरोग्यास बर्याच हानी पोहचवू शकते. आपण खाल्ल्यानंतर चहा प्यायल्याने आरोग्यास काय होते ते जाणून घ्या.



तज्ज्ञांच्या मते अनेक कारणांमुळे जेवणानंतर ताबडतोब चहा पिणे योग्य नाही. हे आपल्या अन्नातील अनेक महत्त्वपूर्ण पोषकद्रव्ये शोषण्यास अडथळा आणू शकतात. चहामधील टॅनिन आपल्या आहारातून लोह आणि प्रथिने शोषून घेण्यास अडथळा आणू शकतात. हे पाचन रस कमी करून एखाद्या व्यक्तीच्या पचनावरदेखील परिणाम करू शकतात.

खाल्ल्यानंतर चहा पिण्याची सवय आपल्याला ब्लड प्रेशरचा रुग्ण बनवू शकते. वास्तविक, चहामध्ये कॅफिन असते. जेवणानंतर चहाचे सेवन केल्यास रक्तदाब समस्या उद्भवू शकते. उच्च रक्तदाब किंवा उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांनी जेवणानंतर चहा पिऊ नये.

खाल्ल्यानंतर चहा पिण्याची सवय तुम्हाला हृदयरोगी बनू शकते. दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवणानंतर चहाचे सेवन केल्यास हृदयविकार होऊ शकतात. जेवणानंतर लगेच चहाचे सेवन केल्यास पाचन तंत्र कमकुवत होऊ शकते आणि शरीरात ॲसिडचे प्रमाण वाढू शकते. ज्यामुळे अन्न पचायला त्रास होतो.

जेवणानंतर चहा पिण्यामुळे शरीरातही लोहाची कमतरता उद्भवू शकते. ज्यामुळे शरीरात लोहाचा किंवा रक्ताचा अभाव असतो. चहामध्ये आढळणारा फिनोलिक कंपाऊंड लोहाच्या शोषणात हस्तक्षेप करतो. जेवणानंतर चहा प्यायल्याने शरीर प्रथिनांसह शरीरासाठी आवश्यक असणारी पोषकद्रव्ये आत्मसात करू शकत नाही, ज्यामुळे अशक्तपणाची समस्या उद्भवू शकते.

सामान्यत: लोकं डोकं दुखत असल्यास चहा पितात. डोकेदुखीपासून मुक्त होण्यासाठी हा एक उत्तम घरगुती उपाय मानला जातो, परंतु जेवणानंतर चहा घेतल्यानंतर शरीरात वायू तयार झाल्याने डोकेदुखीची समस्या उद्भवू शकते. जर तुम्हाला चहाची आवड असेल तर तुम्ही जेवणानंतर एक ते दोन तासांनी चहा पिऊ शकता.

# धोनीकडून निवृत्तीच्या चर्चांना पूर्णविराम

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीने आयपीएलमध्ये चेन्नईला चौथ्यांदा ट्रॉफी जिंकवून दिली. अंतिम सामना संपल्यानंतर धोनीनेच हर्षा भोगले यांचा एका प्रश्नाला उत्तर देताना निवृत्तीच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

सामना संपल्यानंतर घेतलेल्या मुलाखतीत हर्षा भोगले यांनी धोनीला विचारले की, आपण मागे सोडून जात असलेल्या वारशाचा तुला अभिमान वाटत असेल. यावर उत्तर देताना धोनीने, आपण अजून सोडलेले नाही, असे मिश्कील उत्तर दिले.

# टी-२० वर्ल्डकपनंतर द्रविड होणार टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि सध्या राष्ट्रीय क्रिकेट अकदामीचा कारभार पाहणारा राहुल द्रविडवर भारतीय क्रिकेट नियमक मंडळाने म्हणजेच बीसीसीआय मोठी जबाबदारी टाकली आहे. राहुल द्रविड भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक होणार आहे.

श्रीलंकेविरुद्ध मर्यादित षटकांच्या मालिकेत राहुल द्रविडने भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिले होते. सध्याचे प्रशिक्षक रवी शास्त्री यांचा कार्यकाळ टी-२० वर्ल्डकपनंतर संपत आहे. त्यानंतर द्रविड भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारणार आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना सूत्रांनी सांगितले की, द्रविडने प्रशिक्षक होण्यास संमती दिली आहे. यापेक्षा चांगले काहीही असू शकत नाही. भारतीय संघ आता बदलाच्या मार्गावर आहे. अनेक युवा खेळाडूंना यात सहभागी व्हायचे आहे. या सर्वांनी द्रविडसोबत काम केले आहे. भारतीय क्रिकेटसाठी हे खूप महत्त्वाचे असू शकते. द्रविड हा नेहमीच बीसीसीआयचा पर्याय होता.

विक्रम राठोड फलंदाजी प्रशिक्षक म्हणून कायम राहणार आहेत. द्रविडचा विश्वासू सहकारी पारस म्हांब्रेची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तो भरतची जागा घेईल, तर क्षेत्ररक्षण प्रशिक्षक आर. श्रीधर यांच्या बदलीबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

# पनवेलमधील सिनियर क्रिकेट टी क्लबच्या हंगामाची सुरुवात

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणाऱ्या विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या दिवशी पनवेलमधील सिनियर क्रिकेट टी क्लबच्या खेळाडूंनी नूतन हंगामाची सुरुवात झाली. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व नंतर चौफेर फटकेबाजी करीत या हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

पनवेल परिसरातील विविध स्तरातील ज्येष्ठ व तरुण खेळाडू एकत्र येत एचओसी कॉलनी येथील तालुका क्रीडा केंद्राच्या मैदानावर सराव करीत असतात. क्लबच्या वतीने यंदाच्या नव्या हंगामाच्या शुभारंभास उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत माजी कर्णधार प्रदीप पाटील याच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यास नगरसेवक नितीन पाटील, क्लबचे मार्गदर्शक ॲड. चंद्रशेखर वाडकर, उद्योजक संजय पाटकर, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, राजेश शेट्टी, डॉ. ययाती गांधी, डॉ. आशिष गांधी, डॉ. नितीन पोवळे, डॉ. सचिन शेठ, रवींद्र राऊत, सागर ठाकूर, डॉ. कुंभार, मिलिंद जोशी, डॉ. कौशिक, खजिनदार राजेंद्र पाटील, सचिन डांगरे, सुखम हॉस्पिटलचे डॉ. संतोष जाधव, कर्णधार सुभाष पाटील, उपकर्णधार प्रमोद पाटील, विजय पाटील, अभिजित पाटील, संदीप पाटील, प्रताप गावंड, मंदार नाडगौडी, कुणाल सावंत, सुहास देशमुख, प्रफुल्ल पेंडसे, सागर आटवणे, त्रिशूल म्हात्रे, रवी घाडगे, अप्पू कुंभार, श्री. पाटेकर आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिनियर क्रिकेट टी क्लबच्या खेळाडूंना यशस्वी हंगामासाठी शुभेच्छा दिल्या.

## विश्वचषक फुटबॉल पात्रता फेरी

# ब्राझीलच्या विजयात नेयमार चमकला

**मानौस : वृत्तसंस्था**

गुणतालिकेत अव्वलस्थानी असलेल्या ब्राझीलने विश्वचषक फुटबॉल पात्रता फेरीत दमदार खेळ कायम ठेवताना उरुग्वेला ४-१ अशी धूळ चारली. ब्राझीलच्या चारपैकी तीन गोलमध्ये प्रमुख खेळाडू नेयमारचा सहभाग होता.

कोरोना उद्रेकानंतर पहिल्यांदाच स्टेडियममध्ये उपस्थित प्रेक्षकांसमोर खेळणाऱ्या ब्राझीलने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट खेळ केला. १०व्या मिनिटाला नेयमारने गोल करीत ब्राझीलला १-० अशी आघाडी मिळवून दिली. हा नेयमारचा ७०वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला. त्यामुळे ब्राझीलसाठी सर्वाधिक ७७ गोलच्या पेले यांच्या विक्रमापासून तो केवळ सात गोल दूर आहे. राफिन्हाने १८व्या गोल करीत ब्राझीलची आघाडी दुप्पट केली. उत्तरार्धात ५८व्या मिनिटाला नेयमारच्या पासवर राफिन्हाने वैयक्तिक दुसरा, तर संघाचा तिसरा गोल झळकावला. यानंतर अनुभवी लुइस सुआरेझच्या गोलमुळे उरुग्वेने ब्राझीलची आघाडी १-३ अशी कमी केली, मात्र नेयमारच्या पासवर राखीव फळीतील गॅब्रिएल बाबरेसाने गोल केल्यामुळे ब्राझीलने हा सामना ४-१ असा जिंकला. ब्राझीलचा हा पात्रता फेरीतील ११ सामन्यांत दहावा विजय ठरला.

FIFA WORLD CUP Qatar2022

### अर्जेंटिनाची पेरूवर मात

अर्जेंटिनाने पेरूवर १-० अशी मात करीत गुणतालिकेतील दुसरे स्थान भक्कम केले. लौटारो मार्टिनेझने केलेल्या गोलच्या जोरावर अर्जेंटिनाने पात्रता फेरीतील सातव्या विजयाची नोंद केली तसेच बोलिव्हियाने पेराग्वेचा ४-० असा धुव्वा उडवला. त्यांच्याकडून रॉड्रिगो रामाल्लो, मोईसेस अंगुलो, व्हिक्टर अब्रेगो आणि रोबेर्तो फर्नांडेझ यांनी गोल केले. चिलीने व्हेनेझुएलाने ३-० असे पराभूत केले.





**पनवेल : दसरा गणेशोत्सवानिमित्त न्हावेखाडी मधलापाडा येथील खाडीचा राजा मित्र मंडळ आणि मोठापाडा येथील गणराज मित्र मंडळाच्या बाप्पाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच मंजुषा ठाकूर, सदस्य सागर ठाकूर, राम मोकल, नरेश मोकल, सुभाष कडू, भरत मोकल, रतन ठाकूर, सुजित ठाकूर, गोपी ठाकूर, शंभो ठाकूर, सतिश ठाकूर, हरेश्वर कडू आदी उपस्थित होते.**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com